# माझी गोष्ट निकट पुरुष डियर पिनाक

१५०९०



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा·वा·
दा. क्र. १५०९०

IRBK-0115090

वा०क्र० १५०९० / ३८८१
१५।३।७४
वा० क्र० १५४५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासीक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 1 APR 1974

5 SEP 1976

2 5 MAY 1977

किंमत पाच रुपये

©
सुहास तांबे

प्रकाशक
प्रकाश दामोदर रानडे
नीलकंठ प्रकाशन,
१६४३, सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे ३०

पहिली आवृत्ति
४ जानेवारी १९७४

मुद्रक
अरुण दत्तात्रय गपचुप
प्रगती मुद्रणालय
१०८ पर्वती
पुणे ९.

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

लीला

आणि

निशिकान्त

यांना

( काय की ज्याचं क्रेडिट त्याला )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १५०८० नों. दि ...........
वि. को. वा. ... क्र. ........ ......

माझी गोष्ट
३

लिफ्ट
२४

एकांकिकांचे हक्क
आणि परवानगी
सुहास तांबे
१६०७, सदाशिव पेठ,
पुणे ३०.

पुरुष
४०

डियर पिनाक
५७

# माझी गोष्ट

१५२५८ ग्रं.वा.
३८८९ १४/३/६४

[ पडदा उघडलेला नाही. प्रेक्षकांतून एक तरुण पडद्यापुढे येतो. ]

तरुण .... थांबा ! तिसरी घंटा व्हायची आहे तोवर माझं थोडं ऐकून घ्या. तुम्ही प्रेक्षक आहात. रसिक आहात. तुम्ही रंगभूमीवरच्या सुखदुःखाशी समरस होऊ शकता. त्यामुळेच माझी गोष्ट तुम्हांला सांगायचा मला मोह होतो आहे. खरं तर एकांकिका पाहायला तुम्ही उत्सुक आहात, मला माहित आहे. पण माझी ही गोष्ट तशी लहान आहे. फार वेळ खाणारी नाही. मी —— ( सांगायला लागणार इतक्यात आठवण झाल्यासारखी —— ) मी कोण असं बऱ्याच जणांना कोडं पडलं असेल. काही लोकांना वाटलं असेल हल्ली नाटकातले लोक प्रेक्षकांतून आणायचं फॅड आहे त्यातलंच हे काही ! काहींना माझं हे अचानक स्टेजवर येणं वेडाचा प्रकारही वाटला असेल.

( प्रेक्षकांत हा तरुण उठून आला त्याच्या आसपासचे ४–५ तरुण —— " ए विज्या साल्या बस लेका ! " " टेरिफिक फिरकी घ्यायला ! " " ए, भंकस पुरे, साला पब्लिक खवळलं तर लाज घालवशील आमची " )

पक्या, ही भंकस नाही ! गेल्या दोन–चार दिवसांत मी तुम्हाला.... खरंच, रसिकजनहो गेल्या दोन–चार दिवसांत मी माझ्या रोजच्या दोस्तांना देखील भेटलो नाही ! कां भेटलो नाही ? मी इथंच तर होतो. मग केलं काय ? तीच तर सगळी गोष्ट ( थांबून ) माफ करा हं....मला हे साहित्यिक पद्धतीनं वगैरे नाही सांगता येणार !.... आणि पक्या, अरुण आणि कंपनी जरा सबूर पण... मला काय सांगायचं ते ऐकून तर घ्या. मग कराच आमचा फालुदा, तर.... माझी गोष्ट !

अगदीच ओघानं वगैरे सांगायचं झालं तर....हे सगळं परवा सुरु झालं ! संध्याकाळी ! आमच्या कॉलेजात आपल्या त्या शिवाजीराव भोसल्यांचं लेक्चर झालं ! ( हंसतो ) हं ! एरवी–मी आणि संध्याकाळी

आणि लेक्चरला–हे पाहून आमच्या फादरना झीटच आली असती ! पण शुभदा देवधर बसली, म्हणून मला बसावं लागलं ! तिच्यावर इंप्रेशन मारायला म्हणून एकाग्र झाल्याचा आव आणला आणि– आईशपथ भाषणाच्या शेवटी तिला ‘ एक्स्क्यूज मी घरी जायला सोबत करु का ’ म्हणणार होतो ते साफ विसरलो ! त्या भाषणांत मी पार–म्हणजे हरवूनच गेलो होतो ! ( तरुणांच्यात कुजबूज. ) हो अरुण ! शुभदाच्या शेजारच्या बेंचवर बसून शेवटी मी गोची केली म्हणून तुम्ही उचकलात ! पण....खरं सांगतो ! शिवाजीराव भोसले ! ग्रेट ! च्यायला. सॉरी हं !....आत्तांपर्यंत आमच्या तरुण पिढीला वगैरे इतक्या लोकांनी उच्च शब्दात रटाळ पीळ मारला होता की.... आपली तर विकेटच गेली राव ! आसपासचं सगळं मी विसरून गेलो ! आणि कुठंतरी विचार करायला लागलो. इटवॉज अ सेन्सेशन, रिअली ! आईशप्पथ, आयुष्यात प्रथम मी विचार केला ! माझ्या-विषयी ! प्रथमच मी माझ्याकडे वळून पाह्यलं ! आणि हादरलो ! कारण–मी काही नव्हतोच ! ‘ वीस वर्षाचा घोडा ’ असं फादरनी म्हटलं तर मी उसळतो, पण टु बी फ्रँक मला घोडाच्च काय गाढवा-सारखं वाटलं अहो ! ( तरुण हसतात. ) हंसा लेको ! तुमचं काही वेगळं नाही माझ्यापेक्षा ! मला पुढचं सांगू द्या ! मग पहा ! तर दणादणा एकेक प्रश्न नुसते डोक्यात गर्दी करायला लागले ! भाषण संपलं तरी मी असा हरवलेला, डिस्टर्ब्डच होतो ! काही सुधरेचना ! दोस्त कंपनी जरा वेळ थांबली. शेवटी कंटाळून त्यांनी माझा नाद सोडला ! जाता जाता पश्या तर वैतागून म्हणाला ‘ Good night विज्या ! आता भेटेन तेव्हा शुभदाच्या लग्नाची पत्रिका घेऊनच येईन !’ पण माझ्या डोक्यात काहीं शिरतच नव्हतं. वीस वर्षं ! नॉट अ जोक ! कळलंच नाही वीस वर्षं केव्हा गेली ! ऑल वेस्ट ! मी आत्ता कोण आहे ? काही लाख तरुणांच्यातला एक तरुण ? उतारावरनं सायकल

घरंगळत जावी तसा शाळेत—शाळेतनं कॉलेजात वहात आलो. मागची जमा शून्य पुढचं काही माहीत नाही.

( पडद्या मागून आईची हाक ' विजय, जेवायला चल, वाढलंय ' ) आलोऽऽ ! तर....शाळेत असताना मी पुस्तकात झाडाची पानं ठेवावीत तशी मनात काही हळुवार स्वप्नं जपून ठेवायचो ! मी शाळेत जायच्यावेळी आमच्या शेजारचा कुमार असा स्मार्ट ड्रेसमध्ये.... खाडकन् दार बंद करून सर्रकन् निघून जायचा कारमधून ! तसंच आमच्याकडे एकदा वडलांचे बॉस आले होते चहाला ! वडील इतके अदबीनं बोलत होते त्यांच्याशी ! त्याचा तो बो मोठा ग्रेसफुली बांधला होता ! त्यांची सुंदर बायको ....

( पुन्हा हाक- 'अरे थंड होतंय, जेवायला चल. विजय' ) हो ऽ ऽ ! मी मनाशी सारखा सुखावत असे की मी एके दिवशी असाच होणार ! समबडी सो इंपॉर्टंट, सो ग्रेसफुल ! आत्ता सुद्धा चार चौघांच्यात मी न कळत पहात असतो की लोक माझ्याकडं पहात असतील; माझ्याकडे बोट करून दुसऱ्याला ' तो हा बरं का ' असं सांगत असतील,. ऐकणारा भुवया उंचावून माझ्याकडे पाहील आणि त्यावेळी मी लक्षच न देता कुणाशी तरी फार गंभीर बोलत असेन ! ( थांबून ) प्रत्येक वेळची निराशा लपवून मी नव्या उत्साहानं वावरतो आणि गर्दीत मिसळून जातो ! मी....(वडलांची दणदणीत हाक· 'विज्याऽऽ' ( डोळे मिटून उघडत - ) फादर ! जेवण या एकाच कारणासाठी आम्ही दिवसाकाठी भेटतो. अर्थात सारं काही घडतं ते इथंच.

[ पडद्यात जातो. पडदा उघडतो. उजव्या कोपऱ्यात टेबलावर समोरासमोर वडिल व विजय. आई विंगमधून येऊन मधूनमधून निमूट वाढते. ]

फादर .... किती हाका मारायला लागतात ?

विजय .... हो !

फादर .... हो काय ? काय करत होतास ?

विजय ... वाचत होतो !

फादर .... मासिक की फिल्मफेअर ?

विजय .... अभ्यास करत होतो.

फादर .... बरोबर ! दिवसभर उनाडक्या केल्यावर हीच वेळ सापडायची अभ्यासाला !

( शांतपणे जेवण. )

फादर .... परीक्षा केव्हां आहे ?

विजय .... टर्मिनल की फायनल ?

फादर .... आता यानंतर लगेच असेल ती !

विजय .... चौऱ्याहत्तर दिवसांनी.

( शांतता. आई वाढायला येते. विचारते ‘ मंजिरीच्या लग्नाचं काय उद्याच्या ?’ )

फादर .... हो ! तू आणि विजय जेवायला जा. मी जाईन जमलं तर रिसेप्शनला

विजय .... मी येणार नाही.

फादर .... कां ?

विजय .... नाही यायचं.

फादर .... उद्धटासारखी उत्तरं देऊ नको ! हल्लीच्या मुलांना काही मोठी माणसं म्हणजे—

विजय .... मला लग्न बोअर होतं.

फादर .... मूर्ख आहेस ! नसती तर्कटं ! म्हणे बोअर होतं.

विजय .... कोणी कंपनी नसते. नुसतं काय दुष्काळातनं आल्यासारखं जेवणाऱ्यांच्या तोंडाकडे पहात बसायचं !

फादर .... ह्याची तऱ्हाच वेगळी ! काही नाही शेफारतात मुलं. बरोबरीनं वागतो ना आम्ही ! ( आई शांतपणे—“ मग ? ” )

फादर .... जा कोणीतरी ! करा काय करायचं ते ! मंजिरीच्या आईला एखादा खण द्या रीत म्हणून. ( विजय कुत्सित हसतो. फादर रागानं वर पाहतात. )

विजय .... मला वाटतं आई काही आयुष्यात प्रथमच जात नाही लग्नाला ! ( आई दटावते. )

फादर .... बोलू द्या ! हेच ऐकण्यासाठी त्याला लहानाचा मोठा केला !

विजय .... नसता केला तरी मोठा झालोच असतो ! उगाच तसदी घेतलीत !

फादर .... विज्या ! ( शांतता. )

विजय .... काही चुकीचं बोललो नाही मी. एक कौतुकाचा शब्द काढीत नाही कधी तुम्ही माझ्याबद्दल.

फादर .... दिवेच लावलेत फार म्हणून कौतुक करायचं !

विजय .... तुम्हाला वाईट तेवढंच दिसतं माझ्यातलं !

फादर .... जे आहे ते दिसतं. मी बोलतो म्हणून कडू लागतं. कितीदा सांगीतलं की अभ्यास पहिल्यांदा, मग सगळे इतर धंदे ! मला एक इंजिनियर व्हायला नाही जमलं आयुष्यात ! पण तुला काय कमी होतं ! सायन्स झेपत नाही म्हणून रडत आर्टस्‌ला घातलं. बाप खायला घालतोय ! पैसे देतोय सगळे चोचले पुरवायला ! तर काय ? त्या मोबदल्यात फक्त व्यवस्थित अभ्यास करावास ! चांगलं शिकावस ! पण तुझे इतर धंदे ! कुठं नाटकं, सिनेमे, ट्रिप्स् ! काही नाही तर आहेच टोळकं ! ऊठबस गप्पाटप्पा !

विजय .... पण बाबा या वयात—

फादर .... तू मला शिकव ! आम्ही कधी तरुण नव्हतोच नाही ना रे ! वयाच्या गोष्टी सांगतोय ! आमच्या वेळी जी ध्येयनिष्ठा, तळमळ, चिंतनशीलता असायची तरूणांत—अरे आता नुसता तमाशा चालतो ! नुसतं केस वाढवून आणि घाणेरडे कपडे घालून हुंदडायला हवं ! काय तुमची ती चिप गाणी ! सगळ्या गाण्यात आपलं इष्क, प्यार,

दिल् ! ( वाढायला आलेल्या आईला ) बरं का ! काल संध्याकाळी रस्त्यानं जात होतो तर मुली चालल्या होत्या तीन–चार, मागून दोन मुलं आली सायकल वरून आणि धक्का मारून गेली ! असा संतापलो, दोन कानशीलात द्याव्याशा वाटल्या ! पण पाहतो तर मुली खिदी खिदी हंसत होत्या आणि एक दुसरीला म्हणते ' अय्याऽ डिट्टो राजेश खन्ना ' ! क्या ! ( आई निर्विकारपणे निघून जाते. )
( शांतता. )

फादर .... माझ्या पाकिटातले वीस रुपये कुणी घेतले ?

विजय .... मी.

फादर .... कशासाठी !

विजय .... सिनेमे पाह्यला ! ( आई–येऊन– ' मी वीस रुपये घेतलेत उद्या मंजिरीला द्यायला ' )

फादर .... एल्. आय्. सी. चा हप्ता भरायला सांगीतलं होतं ! भरलास ?

विजय .... बावीस !

फादर .... बावीस काय ?

विजय .... हा प्रश्न बाविसाव्यांदा विचारलात !

फादर .... थोबाड फोडिन विज्या ! विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दे.

विजय .... ( एका दमात–एका सुरात ) हप्ता भरला नाही–एल. आय्. सी.त संप चालू आहे. दुरुस्तीला टाकलेलं घड्याळ आणलं नाही, पावती तुमच्या खिशात राहिली. लॉन्ड्रीतनं कपडे आणले नाहीत, कारण विसरलो ! परवा आली होती ती वृंदा दंडवते ! ती माझी वर्गातली मैत्रीण आणि केवळ मैत्रीण ! सायकल उद्यापासून रोज सकाळी पुसत जाईन !
( शांतता. आई येते. )

फादर .... ( आईला ) पाह्यलंत ? ही माझी किंमत ! वीस वर्षांचा घोडा झाला तरी डोक्यात अक्कल नाही काडीची ! पण थोबाड पहा ! जीभ लांब झाल्ये हातभर ! अशा मुलापेक्षा निपुत्रिक राहिलो असतो तर बरं !
( जातात. )

आई .... ( वडिलांचे ताट आवरता आवरता ) पण विजय, तू तरी इतकी डोक्यात राख का घालतोस ?

विजय .... म्हणजे मीच डोक्यात राख घालतो ! मीच तेवढा मूर्ख ! तू शेवटी बाबांच्याच पार्टीतली ! आम्हांला जणूं कांही अक्कलच नाही ! काय कळतं ते फक्त त्यांनाच !

आई .... अरे, पण काही झालं तरी ते तुझे वडील—

विजय .... म्हणून इतकं तरी संयमानं घेतोय बरं आई ! दुसरा कोणी असता तर एक क्षण नसतो थांबलो ती भंकस ऐकत. तेच तेच प्रश्न, तोच उपदेश ! हॅ: ! फेड अप् !

आई .... प्रेमानंच सांगतात ते—तुझ्याच भल्यासाठी—

विजय .... हो ! हो ! काय विचारता ! आणि माझंच भलं पाह्यचं तर माझं मला समजतंय ! मीही काही लहान नाही आता. ( उठतो ) आणि माझं पत्र कुणी फोडलं !

आई .... अरे ह्यांनीच ! म्हणाले सहज—

विजय .... त्यांना सांग—माझी पत्रं पुन्हा फोडू नका ! माझ्यापर्यंत ती बंदच आली पाहिजेत. ( जातो )

( विजय हात पुसत स्टेजवर येतो—मध्यावर )

विजय .... सॉरी हं ! हे जेवणाचं निवालं मधेच ! आणि फादरची नि माझी तगातणी झाली त्यात काही विशेष नाही बरं कां ! डोंट् टेक इट् सिरीयसली ! हे आपलं रोजचंच आहे. आणि आम्ही समजा जेवलो असतो गप्पपणे—तर शेजारच्या घरातनं हेच ऐकू आलं असतं ! फार तर संबोधनं वेगळी, विषय वेगळे ! पण सूर हाच, तालही असलाच... आडा चौताल ! तर परवाचं सांगत होतो नाही ! संध्याकाळी असलाच जेवणाचा फार्स झाला; प्रयोग क्रमांक—दहाशे साठ ! रोजच्यासारखा खोलीत जाऊन पडलो पण पलिकडचा फिल्मफेअर कांहीं उचलवेना ! डोक्यात नुसता गोंधळ झाला होता. सिनेमा

सुटल्यावर सायकलींचा उडतो तसा ! तशाच शेकडो घंटा वाजल्यासारख्या वाटत होत्या डोक्यात ! मी मग खोलीतनं पाय न वाजवता घराबाहेर सटकलो ! गार हवेवर जरा बरं वाटलं. कोपऱ्यावर पान घेतलं आणि विल्स घेतली पेटवून किंग साइझ ! एरवी पोटभर जेवण, पान आणि विल्स् किंग साइझ म्हणजे तब्येत रंगून जाते. पण त्या दिवशी काही खरं नव्हतं ! कट्ट्यावर बसलो ! एक मोठा झुरका घेतला ! धुरांची सर्कल्स् सोडली हळुवार आणि माझं आवडतं स्वप्न सुरू झालं. अशी जया भादुरी तिकडनं येतीय, मग दोन मवाली छेड काढतात, मग मी उठून ' कोन आहे बे ? ' पण मारामारीच्या आधीच त्या दिवशी मला कंटाळा आला. वाटलं ही जया बॉम्बेला तिच्या आलीशान फ्लॅटमधे झोपली असेल आता सुऽऽम ! आणि मी इथं लेंगा शर्ट घालून पुण्याच्या लक्ष्मी रोडवर सीन रंगवतोय ! मी मोठ्यांदा ओरडलो ' कऽऽट् ! ' नशीब कोणी ऐकलं नाही. पण रात्रीचं एक बरं असतं ! कोणी कुणाकडं पहात नाही ! ( थांबून ) माझं लाडकं स्वप्नही तुटलं आणि माझी फार वाईट अवस्था झाली ! हा विजय अभ्यंकर ! एक दिवशी जन्माला आला ! वीस वर्ष आयुष्याचा नुसता राडा केला ! शाळेत दंगा, उनाडक्या ! कॉलेजात दोस्त कंपनी ! घाणेरडे जोक्स, सगळ्याची टिंगल ! दिसली पोरगी पडले प्रेमात ! च्यायला, एक वळून पहात नाही ! आतापर्यंत वरच्या वर्गात जात राहिलो म्हणून इथवर आलो ! तसेच एक दिवस बी. ए. होणार ! मग फादर आपलं वेट वापरून कुठे तरी डकवणार ! मग रीतसर एक पोरगी बघून बिघून वरमाला घालणार ! मग उर्वरित आयुष्य बायकापोरांवर भाव मारीत.... की च्यायला मधेच कधी तरी—राम बोलो ! एक किडा आला-गेला ! सिगारेटचा चटका बसला तेव्हा उठलो ! फिरत फिरत लकडी पुलावर आलो ! पुलावर आणखीनच भिती वाटायला लागली !

अधांतरी उभा आहे असं वाटलं ! किंवा असं पॅराशूटनी उतरतोय आणि मधेच थांबलेलो ! वारा नाही काही नाही. दोन्ही बाजूला नदीच्या पात्रात गुहेतल्यासारखा गडद अंधार ! नाही म्हणायला दूर स्मशानात एक आगीचा तुकडा ! वर–फक्त आकाश ! आकाशांत पाहिल्यावर प्रश्नांची एक ब्रिगेडच डोक्यात घुसली ! हे आकाश म्हणजे काय आहे ? त्याच्या पलीकडे काय असेल ? आपल्या सूर्यासारखे कोट्यावधी सूर्य या आकाशगंगेत आहेत म्हणे ? अशा आकाशगंगा किती ? हे आहे तरी काय ? माणूस मेल्यावर जातो कुठं ? माणूस मरतो कां ? मरायचंच तर जगतो कां ? असे शेकडो प्रश्न ! पण तितक्यात साडेबारा झाले आणि डेक्कन–अलकाचे पिक्चर्स सुटले ! पूल एकाएकी जिवंत होऊन वहायला लागला ! आणि आयुष्यात प्रथमच मला एक अफलातून फिलींग आलं. मी त्या गर्दीत पोरी शोधल्या नाहीत की स्कूटरवर खेटून जाणारी जोडपी पाहिली नाहीत. मी लेंग्यात असल्याचंसुद्धा भान मला नव्हतं ! तिऱ्हाईतासारखा, एखाद्या दुसऱ्या जगातून आल्यासारखा मी ती हलणारी माणसं पहात राहिलो ! टेरिफीक गंमत वाटली. पण हा प्रवाहही अचानक थांबला ! पुन्हा शांतता ! रिकामा रस्ता ! मी घरी परतलो ! वाटेत एक प्रश्न मात्र डोक्यात जाम रेंगाळत राहिला ! मी कोण ? विजय अभ्यंकर नांवाचं लेबल लावलेला अब्जावधी माणसातला एक माणूस ? की आणखी कोणी तरी ! जगाचं सोडा ! माझ्या आसपासच्या लोकांना तरी मी कोण वाटतो ? आणि गंम्त सांगू; ह्या दोन दिवसांत ' मी कोण ' हेच जाणून घ्यायचं मला वेड लागलंय ! माझे म्हणून जे कोणी आहेत त्या सगळ्यांच्या बोलण्यातनं मी सारखा काढायचा प्रयत्न करतोय की ' मी त्यांना कसा वाटतो ' एक हाडामासांचा साधासुधा मनुष्य की आणखी काही... (एक मुलगी डावीकडच्या विंगमधून येते. मुद्दाम हळू चालत्ये असं वाटतं. )

विजय .... ( चमकून—अचानक पुढे होऊन ) excuse me ! ( मुलगी थांबते. ) अं....अं नाही कुठं चाललात ?

मुलगी .... ( विंग मधल्या मुलींना उद्देशून ) ए कुठं चाललात ? बरं तुम्ही पुढं व्हा. मी आलेच पाच मिनिटांत !

विजय .... ओह ! थँक यू ! नाही... पण... तुम्ही माझी कविता ऐकाल ?

मुलगी .... अय्या ! ग्रेट ! तुम्ही कविता करता ?

विजय .... करीत नाही ! ..पण काल अचानक केली. बाय गॉड, आयुष्यात प्रथम! ( प्रेक्षकातला त्याच्या कंपूतला एकजण ओरडतो ' विज्या,छोऽऽड ' इतर त्याला गप्प करतात. )

विजय .... काल शिवाजीराव भोसले काय सुंदर बोलले नाही ! खरं तर आपले सर, घरी आई—वडील इतकी वर्षे तेच सांगायचे, पण शिवाजीराव भोसल्यांच्या तोंडून ऐकलं आणि खाडकन् चपराक....

मुलगी .... कविता ऐकवता ना ?

विजय .... हो ! पण तीच कशी झाली, का....

मुलगी पण मला पिरीयडला जायचंय—

विजय .... बरं...( आवंढा गिळून खिशातून कागद काढतो. ) आखीव रेखीव काळ्याशार डांबरी रस्त्यावर—

मुलगी .... कवितेचं नांव ?....

विजय .... आं ? नाही नाव नाही ! अशीच ! वाचूं ?

मुलगी .... हं ! ( मुलगी घड्याळात पहाते. )

विजय .... आखीव रेखीव काळ्याशार डांबरी रस्त्यावर
इतरांमागून इतरांबरोबर चालत होतो
थकली भागली पावलं ओढीत
मधेच कशी अवचित अशी लागली ही पायवाट
मऊ सुंदर आणि तितकीच अनोळखी
ही धुळीची वाट न मळलेली
वळून पुढे गेली कुठे कळत नाही
( घंटा होते. )

विजय .... अं—! तुम्हांला—

मुलगी .... च्च्! थांबू नको रे! पुढं!

(पुन्हा तरुणांच्यात कुणीतरी 'थांबू नकोरे? विज्या च्यायला मानला' इतर गप्प करतात.)

विजय .... ही धुळीची वाट न मळलेली
वळून पुढे गेली कुठे कळत नाही
मी अनवाणी दिशाहीन
हात तुझा मागतो आहे
दोस्त सारे रस्त्याने गेले
तुझ्याशिवाय मी एकटा आहे (कागदं खिशात ठेवतो.)
कशी वाटली (मुलगी तंद्रीत आहे.) कशी वाटली ....
शुभदा!....देवधर!

शुभदा .... तुम्ही....ही तुमची कविता?

विजय .... वाटत नाही?

शुभदा .... नाही, तसं नाही! पण....(खूप अस्वस्थ शांतता....) आपण कँटिनला जायचं? (दोघं डाव्या विंगेत जातात. प्रेक्षकातला एक तरुण "च्यायला विज्याची कमाल आहे! इथवर गेलं आणि मला सांगितलं नाही." म्हणत स्टेजवर येतो. विज्याला हाक मारत डाव्या विंगेत जातो. उजव्या विंगेतून विज्या आणि शुभदा येऊन खुर्च्यांवर बसतात. शुभदा मैत्रिणींना हात करते. विजय खूप अस्वस्थ. ती त्याच्याकडे पहाते, तेव्हां तो समोरचं पाणी पितो. शुभदा बोलू लागते, तिचे शब्द ऐकू येत नाहीत. शुभदा त्याच्याशी बोलतेच आहे. विजय प्रेक्षकांना सांगू लागतो—)

विजय .... खोटं वाटेल पण ही फॅक्ट आहे. ज्या मुलीशी बोलायला मी वर्षभर चाचरत होतो! हजारदा रंगीत तालमी करून शेवटी ऐन मोक्याच्या वेळी पळ काढत होतो त्या मुलीशी मी दीड तास गप्पा मारल्या!

काय काय बोल्लो ते आता नाही आठवत पण तिनं काही काही सांगितलं आणि माझ्या तोंडाचा आ मला हातानं बंद करावा लागला (विजय शुभदाचं ऐकू लागतो. पुन्हां प्रेक्षकांकडे वळून—) तिला माझ्याविषयी मलासुद्धा माहिती नसणारं खूप काही माहिती होतं ! उदाहरणार्थ, मी अमिताभ बच्चनसारखा दिसतो म्हणून तिच्या मैत्रिणी तिला जया भादुरी म्हणून चिडवतात ! वगैरे वगैरे ! गॅदरिंगला मी सगळ्यात स्मार्ट कसा दिसलो, वर्गात रोज मी कशी धम्माल करतो, मी स्कॉलर आहे पण बुकवर्म नाही आणि 'अय्या, आज कळलं तुम्ही कविता करता ! ग्रेट ! अजून काय काय सुत गुण असतील बै देव जाणे' पर्यंत सगळं काही ! (विजय शुभदाचं ऐकू लागतो, पुन्हा प्रेक्षकांकडे वळून-) त्या दीड तासांत मी य वेळा प्रयत्न केला तोंड उघडायचा ! सांगणार होतो ! बाई, जरा डोळे उघडून पहा—मी तसा नाही ! मी वाटतो, पण आंतून अगदी सामान्य '—पण नो यूज् !' ती बोलूच देत नव्हती ! आणि बोल्लो असतो तरी 'इतकं सगळं असून अगदी विनयशील' असंच म्हणाली असती ! (विजय उठून पुढे येतो. मागचा सीन फेड आऊट) परिणाम काय झाला माहित आहे ! एवढी आवडती पोरगी वर्षभर जीव टाकलेला—तिचा एक शब्द ऐकण्यासाठी ! ती आमची डेम—अचानक भेटली, बोलली ! एक दोन शब्द नव्हे, एक दोन क्षण नव्हे ! दीड तास !—आणि मी बोअर झालो.

(तरुणात एकदम—'धत्तेरेकी दळभद्रं आयला—')

परवा संध्याकाळी सुरू झालेली ती डोक्यातली खळबळ थांबलीच नाही ! 'मी कोण' हे कोडं सुटलंच नाही. उलट गुंता वाढला ! मी एकच—पण आमच्या फादरचं माझ्याविषयी मत आणि शुभदाचं मत ! काही मेळ ! खरं काय ? शेवटी दोस्ताशिवाय कुणी नाही ! पण एक भेटेल तर——

( डावीकडून मगाचाच तरुण घाईघाईनं येतो. )

पट्या .... आयला, खोलीत बसून काय करतोस ! बाहेर चल !

विजय .... नको रे ! रोज संध्याकाळी पॉश कपडे करून पॉलिश्ड् शूज् घालून लक्ष्मी रोड, डेक्कन जिमखाना हिंडायचा ! कशासाठी ? मला कंटाळा आलाय !

पट्या .... बरं बाबा, दुसरीकडे जाऊ ! फर्ग्युसनच्या ग्राऊंडवर बसू ! ( डाव्या विंगेत जातात. उजवीकडून आई येते; हातात चहाचा कप– )

आई .... इतक्यात कुठं गेला ! चहासुद्धा घेतला नाहीन ! कमाल आहे बाई, या पोराची ! ( चहाचा कप ठेवून जाते. )

( पट्या आणि विज्या येतात; बसतात )

पट्या .... मगाशी काय बकलास ते खरं ?

विजय .... काय ?

पट्या .... शुभदा देवधरचं !

विजय .... हो !

पट्या .... आम्ही काय साल्या वारलो होतो ? येऊन बोलला नाहीस ! च्यायला पोरगी गटवली, काम झालं; आता दोस्त जहन्नममध्ये —

विजय .... तसं नाही रे ! मला काही सांगण्यासारखं वाटलं नाही खास !

पट्या .... तुला काय झपाटलं वगैरे नाही ना कुणी ? हे चालवलंयस काय सध्या ?

विजय .... सांगितलं तर चेष्टा करशील !

पट्या .... त्याच्या आधी पोटात चार गुद्दे हाणीन ! आणि काय रे, ' दोस्त सारे रस्त्यानं गेले आणि तिच्याशिवाय तू एकटा ' काय ? साल्या, कटवलंस आम्हांला आणि वर .. बरं ते जाऊं दे–संध्याकाळचा घरी काय बसून होतास ? शुभदाला घेऊन जरा सेव्हन लव्हज्, सतलज, नाही तर बंडगार्डन—

विजय .... त्यानं काय झालं असतं ?

पट्या .... माझं श्राद्ध !

विजय .... रागावू नको पट्या ! पण मुलगी पाहिली की प्रेम, प्रेमांत पडलं की हॉटेल, पिक्चर्स हे व्हायलाच पाहिजे का सगळं ?

पट्या .... हॅः ! यू आर इंपॉसिब्ल ! इतके दिवस शुभदाच्या नावानं इंबरडा कोण फोडत असे ? आम्ही ! आम्हाला हौस–तुम्हां दोघांचं जमवून द्यायची ! मी बाप शुभदाचा–पोरगी उजत नव्हती—

विजय .... पट्या, पट्या ! माझं ऐकून तर घे ! मला पूर्ण माहीत आहे तुम्ही माझे किती जवळचे मित्र आहात ! तुम्हीच मला कदाचित समजून घ्याल म्हणून सांगतोय ! दोन दिवस-पट्या, मी खूप बदललोय ! कधी नव्हे तो मी विचार करतोय पट्या ! यू वोंट बिलिव्ह ! खरंच, मी कोण आहे ?

पट्या .... रास्कल ! पाजी ! हरामखोर आणि कृतघ्न !–आणि थोडासा चालू !

विजय .... पट्या ! प्लीज ! टेक मी सिरीयसली; चेष्टा नको.

पट्या .... बस्स् तुझी भंकस लेका ! खूप ऐकलं ! दोन दिवसांपूर्वी बरा होतास ! तसा मधनं मधनं सरकायचास पण खोपडी इतकी साफ उलटी नव्हती झाली ! जातो ! बाय् ! ( उठतो. )

विजय .... पट्या ( आश्चर्यानं ) मला—

पट्या .... दॅटस् इनफ ! आणखी पाच मिनिटं थांबलो तर मी पण वेडा होईन !

विजय .... अरे पण ! उद्या शुभदानं घरी बोलावलंय वडलांना भेटायला ! मी काय करूं ?

पट्या .... त्यांना सांग हे सगळं ! म्हणावं कंदिल दाखवा ( जातो. मधेच वळून ) आणि हुंडा म्हणून एक कफनी आणि लंगोटी माग–शिवाय हिमालयाचं फर्स्ट क्लासचं तिकीट. रिटर्न नको ( जातो. दुसरा एक तरुण उठून स्टेजवर यायला लागतो. त्याला पट्या वाटेतच थांबवून परतवतो. जातांना खुणांनी ' विज्याचं डोकं आऊट' झाल्याचं सांगतो. विंगेतून गुरख्याचा आवाज–" वो कौन है बैठेला ? साब सात बजनेके बाद यहाँ बैठ नही सकते ! चलो ! " विज्या उठून विंगेत जातो. दुसरीकडून आई येते; चहाचा कप उचलून— )

आई .... अरे, चहाचा कप तसाच ? कुठं–( विज्या येतो ) अरे चहा सांगितलास आणि तेवढ्यांत कुठं गेलास ? केव्हांचा कप ठेवलाय ! गरम करून आणते हं—

विजय .... ( तुटकपणे ) नको !

आई .... कां रे ?

विजय .... नको म्हटलं ना !

आई .... बरं ! वाढू कां ?

विजय .... अग नको ! काय कटकट आहे ! भूक लागली तर झक मारत येईन.

आई .... ( जाता जाता ) कपडे बदलून हातपाय धुऊन ये ! ( जाते )

विजय .... अरे, नका नका ! अंत पाहू नका ! तुम्ही श्यामची आई, मोलकरीण वगैरे पिक्चर्स पाहिलेत ना ? आमची आई म्हणजे तो ब्रँड ! प्रेम, माया, इं: ! नको वाटतं. (डोळ्यावर हात धरतो ! क्षणभरच–मग एकदम हंसत हात काढतो. ) ओह ! सॉरी हं ! माझी गोष्ट अपुरीच राहिली ! नाही, माझ्या लक्षात आहे ! पण एकेक गोष्टीच अशा निघतात एकातनं एक ! तर–मी कसा विचार करायला लागलो, दोन दिवस कसे चमत्कारिक अवस्थेत काढले, हे मी सांगितलं ! माझ्या जवळच्या सगळ्याना डेस्परेटली भेटलो पण 'मी खरा कोण' ते अजून कळलंच नाही ! म्हणून तर तुम्हाला कदाचित्–ओह, एक्सक्यूज मी ! शुभदाला प्रॉमिस केलंय घरी येतोय् म्हणून ! गेलं पाहिजे ! फार वेळ नाही लावणार ! ( शुभदा डाव्या विंगेतून येते. )

शुभदा .... बस ना ! डॅडी येतील आत्ता ! ( विजय बसतो ) घर सापडलं ?

विजय .... केव्हाचं माहिती होतं ! ( कुणीच बोलत नाही. ) तुझे डॅडी काय करतात ?

शुभदा .... ( उठून ) डॅडी आलेच. डॅडी, हे विजय अभ्यंकर ! स्कॉलर आणि ऑलराउंड वगैरे सांगितलंच आहे मी ! ती परवाची कविता यांचीच !

डॅडी .... ग्लॅड टु सी यू ! बसा ना !

विजय .... थँक्यू ( बसतो. )

डॅडी .... गटे वाचला ?

विजय .... अगदी लकीर्ली ! मरतच होता ! पण तुम्हाला कसं कळलं ?

डॅडी .... ( कमी ऐकू येतं ) आं ? माझं बी. ए. ला स्पेशल इंग्लीश होतं; अर्थात तेव्हाचं इंग्लीश !

विजय .... ( न कळून ) हो ना !

डॅडी .... संध्याकाळी काही खेळता वगैरे की नाही !

विजय .... छे ! तसा म्हणजे आपलं खो खो वगैरे—उगाच !

डॅडी .... उगाच नाही ! तरूणानी खेळलं पाहिजे असं मला वाटतं म्हणून विचारलं !

विजय .... वा ! बंगला छान आहे !

डॅडी .... कुठं आहे ?

विजय .... आं ? काय ?

डॅडी .... तुमचा बंगला !

विजय .... आमचा नाहिये ! तुमचा म्हटलं छान आहे !

डॅडी .... वडिल काय करतात ?

विजय .... बँकेत आहेत.

डॅडी .... तुम्ही काय करणार पुढे ?

विजय .... काय म्हंजे—अजून तसं काही . . .

डॅडी .... नो नो ! हे वाईट ! आजकालचे तरुण .... ( विजय एकदम उठून "कऽऽट्" म्हणून ओरडतो, तेव्हां डॅडी आणि विंगतून चहा घेऊन येणारी शुभदा फ्रीज्ड्, विजय पुढे येतो, मागं हळूहळू अंधार.)

विजय .... मला फार वाटलं 'कट्' म्हणून ओरडावसं ! पण शुभदामुळे बोललो नाही ! पुढे म्हाताऱ्यानं ती नेहमीची रेकॉर्ड लावली ! काही सो कॉल्ड रसिक काही कळत नसून अब्दुल करीम खाँची

रेकॉर्ड लावून माना डोलावतात तसा मी डोलतो ! शेवटी तोच कंटाळला आणि म्हणाला 'थँक्यू'; तशी उठलो. दरवाज्यात शुभदाशी एक दोन मिनिटं नाही बोललो तर आतून हाक आली 'शुभे ऽऽ'; मग तिथूनही हललो. फार थकून गेलो होतो. नकोसे वाटायला लागले ते विचार ! आणि म्हटलं पुन्हा दोस्तांच्यात मिसळून जावं. नेहमीचं रूटीनच बरं होतं, च्यायला ! म्हणून इकडे यायला निघालो ! बस-स्टॉपवर शुभदा भेटली ! आता अशा वेळी काय होतं तुम्हाला पाहून पाहून माहित्ये ! एकजात सगळ्या कवींना खूप खूप बोलाय-चंय पण शब्द उमटत नाही, म्हणजे नेमकं काय होतं त्याचा मला अनुभव आला !

(त्याच्या उजव्या हाताला एक गृहस्थ येऊन उभा राहतो.) एका क्षणी वाटायचं म्हणून टाकावं "आय लव्ह यू !" दुसऱ्याच क्षणी वाटायचं 'काय गाढव आहेस का ? चिडली आणि तमाशा केलान् म्हणजे ?' (शुभदा येते. त्याच्या डाव्या हाताला उभी रहाते– )

शुभदा .... अय्या ! (दोघंही हळूच हंसतात. कोणीही बोलत नाही.)

विजय .... कुठं निघालीस ?

शुभदा .... घरी !–तू ....म्ही ?

विजय .... अं ! तिकडे ! एक एकांकिका आहे–पहायला !

(दुसरा गृहस्थ शुभदाच्या डावीकडं उभा राहतो. तो रस्त्यावरून कुणीतरी जात आहे असा पाहतो.)

शुभदा .... आत्ता मला उगाचंच वाटलं की....कुठंतरी भेटशील.

(गृहस्थ १, गृहस्थ २ ना)

गृहस्थ १ .... काय रामभाऊ ? अहो जाऊ द्या ! असं काय काय पहाल !

गृहस्थ २ .... वा : कोण तात्यासाहेब ! अहो, अहो बाई काय वाईट कपडे घालून चालली होती ! लाजा नाहीत.

(शुभदा व विजय अस्वस्थ होतात. पण अस्वस्थ होऊन दोघांकडे पहाण्यापलिकडे नंतरही काही करत नाहीत.)

विजय .... तुझे डॅडी काय म्हणाले ?

शुभदा .... काय पण इंप्रेशन मारलंस ? खूष झाले ! म्हणाले—

गृहस्थ २ .... ते पोस्टर पाहिलंत काय तात्यासाहेब ? असली उघडी नागडी चित्रं भर रस्त्यात लावायची !

गृहस्थ १ .... अहो पण आजच्या तरुणांना तेच आवडतं ! जिभल्या चाटत जातात ना बघायला ते सिनेमे !

गृहस्थ २ .... अगदी ! ब्लॅकनी तिकिटं घेऊन !

गृहस्थ १ .... सगळाच अंधाराचा मामला ! थिएटराबाहेर आणि थिएटरांत !
("ह्यॅः ह्यॅः" दोघं हंसतात.)

विजय .... डॅडी काय म्हणाले ?

शुभदा .... हो ! म्हणाले हुशार वाटतो पोरगा ! जरा शाय् आहे !

विजय .... मी ? शाय् ?

शुभदा .... असं ते म्हणाले रे ! आमचे डॅडी एकदम जमदग्नी आहेत पण ! त्यांना जिंकणं म्हणजे ग्रेटच !

विजय .... तुला काय सांगू शुभदा....मी....मला....

गृहस्थ २ .... ते बघा ! ते बघा ! आणखीन मिठ्या मारून जा म्हणावं रस्त्यानं ! आपल्या वेळचं काही राहिलं नाही बघा आता !

गृहस्थ १ .... हल्ली जणू काय कायदाच झालाय ! मुला–मुलींनी जोड्या–जोड्या करूनच जायचं !

गृहस्थ २ .... आपल्यासारख्यांना डोळे उघडे ठेवून जगणं मुष्कील झालंय् ! पहा, पहा ! ते पहा ! खेटून पहा चाललेत किती !

गृहस्थ १ .... आणि तिचा पदर ? काही भान ?

शुभदा .... काय सांगत होतास ?

विजय .... अं ! सॉरी हं ! पुन्हा केव्हातरी !

शुभदा .... बरं ! ( घड्याळात पाहून ) अय्या, मला उशीरच झाला. ( रिक्षाला हात करते. ) एक्सक्यूज मी ! जाते हं ! ए–आणि उद्या कॉलेजात भेट हं ! गंमत सांगणार आहे !

( विजय नुसती मान डोलावतो. )

( बस येते. तात्यासाहेब निघतात. रामभाऊ विजयला 'पुढे व्हा' म्हणतात–विजय रागानं–' जा काका ! ती ॲम्ब्युलन्स तुमच्यासाठी आलीय ! ' म्हणतो. रामभाऊ पहायला लागतात. तात्यासाहेब त्यांना ओढून घेऊन जातात. )

विजय .... माणसं ! माणसं ! जाऊ तिथं–नजरेला दुसरं काही दिसतच नाही ! क्याव् क्याव् क्याव् करणारे कावळे सगळे ! हॅः ! ( थांबून ) एनी वे–माझी गोष्ट तुम्हाला सांगितली. असा हा गोंधळलेला मी तुमच्यापुढे उभा आहे. हे सगळं खरं तर तुम्हाला सांगावं असं मला कां वाटलं कुणास ठाऊक ! मी हे दोन दिवस खूप बेचैनीत, अस्वस्थतेत काढले. पण आता हे सगळं इथं सांगताना मला खूप गोष्टी जाणवल्या ! परवापरवापर्यंत अगदी अशक्य वाटणाऱ्या ! अहो माझी शुभदाशी ओळख झाली. ओळखच काय, याच दोन दिवसांत तिच्या घरीसुद्धा जाऊन आलो ! मी .... मी एक कविता सुद्धा केली. ( हंसतो ) कविता ! मगाशी बस मिळाली नाही म्हणून तणतणत पायीच इथं आलो, तेव्हां रस्त्यानं पास होणाऱ्या गाड्यातली, स्कूटर्सवरची माणसं बघून हेवा वाटला. चीडही आली. इथं येऊन बसलो तेव्हाही डोक्यात तेच धुमसत होतं ! दोस्तांजवळ बोलावं तर ते सगळे पोरी पाहण्यात आणि पुढच्या म्हाताऱ्याच्या टोपीत कागद घालण्यात रमलेले ! मी सांगू कुणाला असं होऊन गेलं. आजूबाजूला पाहिलं तर आपल्या आपल्यांत मश्गुल झालेली माणसं ! हीसुद्धा गर्दीच ! ते स्टॉपवर होते तसलेच प्रकार सगळे ! मुक्या बहिऱ्या माणसांच्या गठ्ठ्यात अडकलोय असं वाटायला लागलं. जीव घुसमटला आणि एका तिरिमिरीत इथं येऊन थडकलो.

मला माहित आहे, तुमच्या सहनशक्तीची कसोटी पाहतोय. कारण एरवी नाटकातली पात्रं नाटककारानी रंगवलेली असतात. इथं मी मला जे वाटलं ते तस्सच्या तस्स अगदी ब्लॅक अँड व्हाईटमधे सांगितलं ! कारण स्टेजवरच्या सुखदु:खांशी निदान थिएटरात तरी तुम्ही एकरूप होता हे मी पाहिलंय आणि मला बरं वाटतंय हो खूप, इतक्या वेळ तुम्ही माझ्याकडे लक्ष दिलंच की ! कुणी आपुलकीनं, कुणी सहानुभूती पोटी ! कुणी सवयीनुसार पाहिलं असेल, कदाचित कुणाला माझ्या या अवस्थेसारखे आपल्या आयुष्यातले क्षण आठवले असतील ! हे सगळं मला नवीन आहे! अगदी नवीन ! 'मी कोण' हे मला अजूनही नाही कळलं पण माझ्या हरवलेल्या काही काही गोष्टी सापडल्या. दोस्त, आई, वडिल, पोरी हेच जग वाटत होतं आतापर्यंत ! आता दोस्तांच्या दोस्तीच्या मर्यादा कळल्या, मैत्रिणीच्या सहवासाची लज्जत कळली. आईचं निस्वार्थी प्रेम उमगलं. नवे आणि मोठे प्रश्न पुन्हा पुढे आले हेही खरंच ! पण लकडीपुलावर तिऱ्हाईताच्या नजरेनं पाहताना अनुभवलेलं ते सेन्सेशन डोक्यात कुठं तरी पक्कं बसलंय ! मुख्य म्हणजे 'मी कोण' म्हणता म्हणता मी अंतर्मुख वगैरे होऊन चक्क स्वत:कडे पहायला लागलोय ! ते अध्यात्मवाले हेच काही तरी म्हणतात नाही कां ! जाऊ दे ! जाऊ दे ! एका गोंधळातून आणखी गोंधळ ! पण बरं का या गोंधळातच अफलातून मजा आहे, अहो ...

गृहस्थ .... ( विंगमधून येत ) अहो आता बस् करा, फार झालं.

विजय .... नाही मान्य आहे—मी थोडीशी गैरसोय—

गृहस्थ .... थोडीशी काय ? अर्धा तास झालाय ! तुमचं काही संपेचना !

विजय .... पण मला खरोखर प्रेक्षकांना काही सांगायचंय.

गृहस्थ .... आता माफ करा आणि बाहेर व्हा ! काय सांगायचं असेल ते बाहेर ! आयला, मला काय घेणं त्याच्याशी !

विजय .... अहो पण– ( गृहस्थ त्याला ढकलून फूट लाईटपाशी नेतो आणि आत जात ' पडदा सोड ' म्हणतो. विजयच्या मागे पडदा पडतो. तो सुस्कारा सोडून खांदे उडवतो. ) आता यानंतर रेडिमेड सुखदु:खाचे प्रसंग, खोटे खोटे नट, त्यांच्या मागून डोकावणारे लेखक, दिग्दर्शक हे सगळं तुम्हाला पाहायचंच असेल तर .... ( म्हणत म्हणत बाहेर पडतो. जोरदार तिसरी घंटा. लाइट फेड अप्. पडदा तर पडलेलाच आहे. )

# लिफ्ट

( पडदा उघडतो, तेव्हा स्टेजचा डावीकडील निम्मा भाग पूर्ण प्रकाशित आहे. मोटारी, ट्रक्स इ. आवाज लांबून जवळ येऊन अंगावरून गेल्यासारखे दूर जात आहेत. पसतिशीच्या आसपासचे एक प्राध्यापक, वयाहून प्रौढ वाटणारे, घाईघाईने प्रवेश करतात. प्राध्यापक पँट व मॅनिलामध्ये असून डोळ्यावर चष्मा व हातात थर्मास आवश्यक आहे. लांबून जवळ येणाऱ्या गाडीला हात करतात. गाडी न थांबता निघून जाते. विंगेतून कोणी विद्यार्थी—" नाही सर, तो म्हणतो अजून २||–३ तास तरी गाडी नाही ! " प्रा.— " नाही ? म्हणजे लिफ्ट घेणंच भाग आहे ! " प्राध्यापक बरेच अस्वस्थ. गाडी थांबवण्याचा पुन्हा एक अयशस्वी प्रयत्न. आता ते अगदी अजीजीनं " लिफ्ट ! लिफ्ट प्लीज ! पुणे–पुणे–पूना " असं म्हणत हातानं " फक्त एक " अशी खूण करताहेत. अखेरीस एक ट्रक थांबतो. ट्रकमध्ये दोन व्यक्ती. एक तांबूस विस्कटलेल्या केसांचा व तशाच डोळ्यांचा ड्रायव्हर आणि एक दाढी वाढविलेला तरुण. )

ड्रायव्हर .... ( तोंडात पान आहे. ) कहाँ ?

प्राध्यापक .... पुण्याला ... पुण्या .... पूना जानेका ! एकच आदमी .... ( ड्रायव्हर विचार करतोय असं वाटून ) प्लीज ! माझ्या मिसेसला ॲक्सिडेंट झाल्याचा फोन आलाय ! आणि गाडी तीन तास नाही अजून ! आमची ट्रीप ....

ड्रायव्हर .... ( पिंक टाकून ) ये बाजू आव ! ( तरुणाला ) साब, दरवाजा ( तरुण दरवाजा उघडून उतरतो. प्राध्यापकांना आत घेऊन स्वत: बसतो. प्राध्यापक इतरांना हात करीत करीत असं दाखवितात की ट्रक पुढे निघाली आहे. )

[ शांतता. ट्रक चालू आहे ]

प्राध्यापक .... ( थोडेसे रिलॅक्स होत ) अहो, गेला अर्धा तास उभा आहे मी ! इतक्या गाड्यांना हात केला, पण कुणी थांबलं नाही ! मी आशाच

सोडली होती. खरंच, पण माझं नशीब जोरावर म्हणून ....

ड्रायव्हर .... ( रस्त्यावर कुणाला तरी चुकवित ) च्यायऽला ! ( प्राध्यापक चम कून गप्प होतात. )

( शांतता. ट्रक चालू आहे. )

प्राध्यापक.... ( पुन्हा अस्वस्थ होत– ) किती वेळ लागतो हो पुण्याला जायला ? म्हणजे बाय् रोड प्रथमच जातोय मी, म्हणून विचारलं.

ड्रायव्हर .... ( प्रा. कडे वळून ) पूराऽऽ ( प्राध्यापकांना हातभट्टीचा भपकारा येतो. ते एकदम वळतात. ) दो घंटा !

प्राध्यापक.... दोन तास ? जरा लवकर नाही का जाऊ शकणार आपण ? ( थोडं थांबून– ) फोनवर निरोप तरी असा दिला .... आता हिला काय झालं, कुठं अॅक्सिडेंट झाला की काय ! कितपत लागलंय, काही नाही ! नुसतंच हॉस्पिटलाइज्ड् ! हॉस्पिटल ....

ड्रायव्हर .. . ( रस्त्यावर कुणाला तरी ) आव नीचे साऽली ( खिडकीतून बाहेर पहात ) अबे जान सस्ती हो गयी क्यूं ? खुद तो साली कबरमें जाती और हमकू जेल भिजवाती ! देखिये ना–( प्राध्यापकांकडे वळतो. प्राध्यापक पुन्हा वासानं त्रासतात. )

ड्रायव्हर .... अरे बाबू ( तरुणाला– ) तुम बीचमें बैठो ! आपल्या थोबाडाला साला वास मारतो कंट्रीचा, तो चालत नाही ये सायबाला !

प्राध्यापक.... ( संकोचून ) नाही, नाही ! तसं काही नाही ! काय की संवय नाही !

[ शांतता. ट्रक चालू आहे ]

ड्रायव्हर ... लोनावळा कायकू आये थे बोला ?

प्राध्यापक .... ट्रीप ! सहल ! पिक्निक् ते !

( स्वतःशीच– ) सकाळी किती आनंदात निघालो होतो. कॉलेजच्या रूटीनमधून जरा चेंज ! पुन्हा स्पेशल पॉलिटिक्स म्हणजे ग्रुपही तसा कॉम्पॅक्ट होता ! झकास कंपनी ! ( हे चालू असतानाच डाव्या भागातील प्रकाश मंद होऊन उजवा भाग प्रकाशित झाला

आहे. गाण्याचे सूर, ताल धरला आहे. प्राध्यापक विंगेकडे तोंड करून बसले आहेत.)

प्राध्यापक.... नाही! मी कशाला? तुमचं चालू द्या! मी बघतो नुसता! एंजॉय, एंजॉय (मनात— "का कुणास ठाऊक! हे असे पदर फडफडत असले आसपास की बरं वाटतं! वाटतं .... पण ते वांझ विचार आहेत सगळे! ज्या वयात घाडसं करायची तेव्हा मुलींकडे चोरून पाहण्यात आणि नुसत्या आठवणींनी मोहरण्यात दिवस घालवले! आता प्रोफेसर झालोय तेव्हा मुलींकडे डोळे वर करून पाहण्याचा धीर होतोय! नॉन्सेन्स!") (मुलींचा गलका—"नांव घ्या")

प्राध्यापक.... काय! छे, छे! काही तरी काय! नांव कसलं घेताय! (गलका) अरे मी काय नवविवाहित नाही! दहा वर्षं झाली लग्न होऊन! (गलका) बरं, बरं! हं! लीलावती! (एका मुलीचा आवाज "किती ड्राय सर! जरा काव्यमय घ्या की!") (मनात— "नेमकं अंजूनी हे म्हटलं आणि माझा उरलासुरला उत्साहही गेला! त्या अंजू–दिपा–रिता–राजेश असल्या काव्यमय वातावरणात लीलावती या नावानं अगदी गद्यपणा आला! नॉन्सेन्स! मला नको होतं ते! चार क्षण मला हलकं होऊन जगायचं होतं! चार क्षण मला तरूण व्हायचं होतं! मी चक्क उठलो"— प्राध्यापक प्रत्यक्ष उठून विंगेत जातात. हळूहळू प्रकाश मंद. डावीकडे प्रकाश येऊ लागतो. "त्यांच्यात मिसळलो. सारवळीच्या शिवाशिवित राज्य मुद्दाम घेतलं आणि अंजूला प्रथम आऊट केलं! मग अंजूचा हात ...."—उजवीकडे पूर्ण अंधार.)

ड्रायव्हर .... कबुतरी तो कबुतरी थी लेकिन! माल!

प्राध्यापक.... कबुतरी?

ड्रायव्हर .... साली वो लडकी लोग! आपुनको तो लगा साला, लडकिया लिफ्ट चाहती है! एक–दो कू आगे बिठा दूं–बाकी सब पीछे!

प्राध्यापक ... ( खांकरून ) मी प्राध्यापक आहे ! माझ्या विद्यार्थिनी त्या सगळ्या !

ड्रायव्हर .... मास्तर ? मग तो साला एकदम परमिट ! कोण पण विचारत नाही हात धरला तरी !

प्राध्यापक .... छे ! छे ! अहो प्राध्यापक आणि विद्यार्थिनी म्हणजे एक वेगळंच नातं पडतं ! समाजाच्या दृष्टीनं....

ड्रायव्हर .... छोड ! नाही म्हंजे–तुम्ही असाल बी जंटलमन ! लेकिन आमचा गावातला मास्तर ! दर वर्षाला नवी मास्तरीन लागायची नं त्याला स्कूलला ! वो भी क्या कमालका आदमी था लेकीन ! एक मास्तरीन कंप्लेंट नाय करायची ! सभी आशिक त्याच्यावर नी काय तिच्यामायला !

( मुलींचे आवाज–" सर, तुम्ही याल ट्रीपला ? " " सर, असं काय ! " " मिसेसना पण आणा की बरोबर ! " " कोणी मोठं माणूस असल्याशिवाय धरनं सोडत नाहीत सर " )

प्राध्यापक.... ते बरोबर आहे ! पण आम्हाला असं वागून चालत नाही ! नाही म्हटलं तरी लोक एका वेगळ्या अपेक्षेनं पाहात असतात आमच्याकडे.

तरुण .... शिवाय समाजाचं एक नैतिक धुरीणत्व असतंच की खांद्यावर ! ( मोठ्यांदा हसतो. प्राध्यापक चमकून पाहतात. प्रथमच दखल. ) नाही, नाही ! चालू द्या.

प्राध्यापक.... आपण ?

तरुण .... माझी मीच ओळख करून देतोय म्हणून माफ करा ! पण दिलीच पाहिजे. ओळख करून दिल्याशिवाय तुम्ही लोक बोलत नाही कुणाशी ! मी....पण थांबा ! एक प्रयोग करून पाहू या का ? मी काहीच सांगत नाही माझ्याविषयी ! तुम्हीही सांगू नका ! आणि पाहू या आपण किती बोलू शकतो !

( प्राध्यापक भयंकर गोंधळले आहेत. प्रकाश कमी कमी. उजव्या बाजूस प्रकाश येतो आहे. )

तरुण .... राजकारणावर बोलू या ? की एखादा करंट सोशल प्रॉब्लेम ! नाही-तर—नाहीतर बेस्ट वे. एखादा पिक्चर—( डावीकडे पूर्ण अंधार ) ( उजवीकडे मगाचच्या वरच्या लेव्हलवर स्टाफ रुममधील आराम खुर्चीत प्राध्यापक असून विंगेतल्या अज्ञात व्यक्तीशी संभाषण )

प्राध्यापक .... पण निक्सनची ही मूव्ह....मला वाटतं सिनेटमध्ये स्ट्रॅांग अपोझिशन असणार त्याला ! नेक्स्ट इलेक्शनला ही विल हॅव टू—अं ? मे बी, मे बी ! पण त्या ह्यानी नाही का त्या ह्या—काय, मला वाटतं यस्टरडे किंवा डे बिफोरच्या टाइम्समध्ये—का विकलीमध्ये मला वाटतं—त्या ह्यांचं आर्टिकल, ही स्ट्रॅांगली ॲसर्टस की ( थोडीशी पोझिशन बदलून ) नाही हो ! तो प्रॉब्लेम फार वेगळा आहे ! मी तर म्हणेन—मुलांच्या शाळा वेगळ्या—मुलींच्या वेगळ्या ह्यामुळे आपण त्यांच्या मनावर बिंबवतोच की—अं ? नाही हो—तुम्ही म्हणता तेही खरं आहेच ! पण त्या ह्यांचा कोण ते आपले—ह्या का मला वाटतं गेल्या महिन्याच्या किर्लोस्कर—स्त्रीपैकी कशात तरी—त्यांच्या लेखात त्यांनी स्टॅटिस्टीक्सच दिलंय अशा केसेसच की—( पुन्हा थोडी पोझिशन बदलून ) पाहिला मी तो पिक्चर ! मला काही तितकासा—अं ? नाही तसं स्क्रीप्ट वगैरे चांगलं आहे ! पण काही भाग जरा ऑबसिन—अं ? नाही तसं ते स्टोरीला आवश्यक आहे ते झालंच ! पण अगदी ते हे प्रोफेसर वाळिं—नाही मला वाटतं मिसेस देवधर म्हणाल्या इतका काही तो....म्हंजे हा आपला मला....

( उजवीकडील प्रकाश कमी; पुन्हा डावीकडे प्रकाश )

तरुण .... का हो ? गप्प ?

प्राध्यापक.... खरं सांगू का ?

तरुण .... वेलकम् !

प्राध्यापक .... टू बी फ्रँक इनफ—आय एम् रादर अपसेट !

तरुण .... हो ! तुमच्या मिसेसना काहीतरी—

प्राध्यापक.. . हॉस्पिटलमध्ये हलवलंय्! तिची कंडीशन जरा डेलीकेट आहे. मी घाबरलोच हो! लोणावळ्याला उतरतानाच मिळाला म्हणून बरं मेसेज! नाहीतर संध्याकाळपर्यंत कळलंच नसतं काही! मेसेजही पूर्ण मिळाला नाही, पण! म्हणजे काय झालं, कशानं घडलं वगैरे काही डीटेल्स नाहीत! नुसतच स्टार्ट इमिजिएटली!

तरुण .... अरेच्या! मला माहितच नव्हतं तुम्ही इतकं बोलाल ते! आपण ॲक्सिडेंट हाच विषय घेतला असता संभाषणाला! हरकत नाही! आता! हां, कंटीन्यु!

प्राध्यापक.... आर यू टेकिंग एव्हरीथिंग लाइटली? इथं मला– (जोरात ब्रेक दाबून ट्रक थांबते)

(तिघेही बाहेर बघतात. ड्रायव्हर उतरतो आहे.)

प्राध्यापक .... माय गुडनेस! डेड?

तरुण .... हां! ऑन द स्पॉट! अगदीच यंग दिसतेय!

प्राध्यापक .... छे! मला बघवतही नाही! (डावीकडे प्रकाश कमी, उजवीकडे प्रकाश)

(प्राध्यापक मगाच्याच वरच्या लेव्हलवर–घरगुती वेषात–आराम खुर्चीत बसून विंगेत पहात—

“अग, ही बातमी वाचलीस का? काल तुला म्हटलं ना, तो ॲक्सिडेंट!....पाहिला म्हणजे? जस्ट ॲक्सिडेंट झाला नी मी तिथे पोचलो! हे नुसतं रक्त जिकडे तिकडे! मेंदू तर....टेरीफिक–! वाटायचं काय त्यात? तुम्ही बायका म्हणजे! नुसतं वर्णन ऐकूनच इतकं झालं का? प्रत्यक्षच बघायला हवी होतीस!....कसलं आलंय धीट नि काय! असं काही पाहिलं की मनात पहिला विचार येतो–जग कसं नश्वर आहे याचा! अरे, हे शरीर! जणू काही वाळूचा किल्लाच! आज आहे, उद्या नाही! त्याचं काय एवढं घेऊन बसायचं! अभद्र कसलं? फॅक्ट आहे ही! वस्तुस्थिती! सत्य! बरं! राहूलं!....बाद जेवायला!”)

तरुण .... का हो ? नुसतं पाहून घाबरलात ?

प्राध्यापक.... घाबरलो ! छे, छे ! त्यात काय घाबरायचय् !

तरुण .... नाही, माझ्याबरोबर आला नाहीत !

[ शांतता ]

तरुण .... बाई मेली नव्हती ! अनकॉन्शस् होती !....ऑफ कोर्स उपयोग नाही त्याचा ! शी विल डाय सून !

प्राध्यापक.... फारच इन्जुरीज् आहेत, नाही !

तरुण .... इन्जुरीज् ? ( हसतो ) अंगावरून ट्रक गेली ! थालीपीठ नुसतं शरीराचं !

प्राध्यापक.... भयंकर असं मरण येणं म्हणजे——

तरुण .... मरणच ते ! असं काय नि तसं काय !

[ शांतता ]

तरुण .... बाय द वे ! तुम्हाला कसं मरण आवडेल !

प्राध्यापक.... मिस्टर तुम्ही मगापासून काय आरंभलंय ! प्रत्येक गोष्टीची चेष्टा !

तरुण .... चेष्टा ? फॅक्ट आहे ही ! वस्तुस्थिती ! सत्य ! हे बघा, मरण ही माणसाच्या जीवनातील एक अटळ गोष्ट आहे, होय की नाही ?

प्राध्यापक.... प्लीज, स्टॉप इट् ! मला तत्त्वज्ञान सांगू नका ! काही काळ–वेळ–

तरुण .... एक्झॅक्टली ! मृत्युला काळाचं–वेळेचं कशाचं बंधन नसतं ! आता हेच पहाना ! ही बाई ! कुठं तरी चालली असेल आपल्या कारभाऱ्याबरोबर ! बरं, कारभारी जोडीला म्हणजे कशाची चिंता नाही ! अगदी सुरक्षित ! चालली असेल आपल्याच विचारात....पोरगं भुकेनं कळवळलं असेल, घराला गेलं की लागलीच भाकर टाकायला हवी— आणि एकदम हे असं ! मृत्यु ! अहो, आपलं काय वेगळं आहे ! मोठे रंगून गेलो आहोत आपण जगण्यात ! पण आपण काय–आपले दोस्त काय–आणि आपली बायको–

प्राध्यापक .... स्टॉप इट् आय से ! नॉन्सेन्स !

तरुण ... राहिलं ! तुम्ही बोला ! व्याख्यान देता का एखादं व्याख्यान !

विषय लागेल नाही का ! " भौतिकवाद आणि अध्यात्मवाद " किंवा .... किंवा...." अस्तित्ववादावर धर्माचे अधिष्ठान आहे काय ?" किंवा .... ( ड्रायव्हर विंगमधून बाहेर येतो. )

प्राध्यापक.... ( ड्रायव्हरला ) निघायचं ना ? लेटस् स्टार्ट !

ड्रायव्हर .... ( आपल्याच विचारात ) बुरा हो गया ! बहोत बुरा ! अल्ला करे, किसीको ऐसी मौत नहीं आए बाबा !

तरूण .... करीम क्या बोला ?

ड्रायव्हर .... आं ? नहीं, उसका कोई कुसूर नहीं ! पुलीस भी बोलता है ! वो बोला ! एकदम भाग आयी वो औरत नीचे ! क्या करता साला ! ब्रेक भी मारेगा तो कितना !

तरूण .... कोई था औरत के साथ ?

ड्रायव्हर .... दादला होता नं तिचा ! मर्द का बच्चा, साला ! बीबीला रोड क्रॉस नाही करून देता येत सीधा ! आता–हे नरडं काढून रडतोय, भाऽडू ! मालूम है, भाई ? औरतके पेटमें बच्चा था छे महीनेका....

तरूण .... ओह ! जीव दे म्हणावं ? नवरा म्हणवतोय .... बास्टर्ड !

[ शांतता ]

( प्राध्यापक दरवाज्याशी उभे आहेत )

प्राध्यापक.... ( शांतता असह्य होऊन–भयंकर पडेल आवाजात– ) अहो, मला वाटतं निघू या आपण ! आय एम इन ए हरी !

ड्रायव्हर .... नहीं बे ! हरी कसला ! मास्तर, करीम दोस्त आहे आपला ! दोस्ताला बुरी हालतमध्ये टाकून चलू व्होय ? ना बाबा !

प्राध्यापक ... ( बायकुतीनं ) अहो पण....

[ शांतता ]

तरूण .... ( ड्रायव्हरला ) दोस्त ! करीमला काही त्रास नाही आता ! पुलीस म्हणाले ना करीमचा काही कुसूर नाही !

ड्रायव्हर .... हां, वो तो है.

तरूण .... मग काय तर ! पाच दहा मिनिटात होईल सुद्धा मोकळा तो ! आपण निघू या आता ! तो मास्तर तर रडायलाच लागेल नाही तर–

ड्रायव्हर .... सच ! वो भी आफत साली ! ( निघतो. ) करीमको बोलके आया ! ( डावीकडचा प्रकाश हळूहळू कमी. )

तरुण .... काय मग ? देता एखादं व्याख्यान ! टाळीच्या वाक्याला टाळी देईन मी. ( डावीकडे अंधार, उजवीकडे मगाचच्या वरच्या लेव्हलवर प्राध्यापक माईकसमोर उभे आहेत-—)

प्राध्यापक.... आज समाजामध्ये....आणि जे कांही...प्रश्न किंवा ज्याला आपण सोशल प्रॉब्लेम म्हणतो...ते....त्यानी काहीसं वेगळं आणि माझ्या मते....एक गंभीर असं काहीसं स्वरूप घेतलेलं आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात....देशात....समाजात....नागरीकांत जी एक....एकतेची भावना होती....आपण सारे एक....असं जे एक काही वातावरण होतं....समाजाच्या विचाराना....आचारांना जे एक नैतिक अधिष्ठान....आणि होतं....ते ह्या गेल्या दशकामध्ये....आणि लोप पावताना....लयाला जाताना....असं आज....आणि दिसत आहे.... पण ह्या साऱ्या....अधोगतीचं उत्तरदायित्व....ज्या समाजधुरीणांवर आहे...आज जे स्वतःला पुढारी म्हणवून घेत आहेन, कुठे आहेत ते ! (टाळ्या) आज....सामान्य नागरीकाच्या जीवनाची....जी....एकूण अवस्था आहे....काही मूलभूत मूल्यांचा....आज विसर पडला आहे ....समाज ते फार काळ सहन करणार नाही.(टाळ्या) समाज म्हणजे तरी शेवटी काय ? समाज म्हणजे व्यक्ती आणि व्यक्ती म्हणजे समाज ! ( टाळ्या ) आज....समाजाला....जे नेतृत्व हवंय–ते.... राजकीय, धार्मिक, अर्थशास्त्रीय, वैचारीक नेतृत्व नकोय....समाजाला आज....नैतिक नेतृत्वाची गरज आहे ! ( टाळ्या ) ( ह्यानंतर वीज गेल्याने नुसता अभिनय. एक जोरदार वाक्य बोलल्याचा अभिनय, टाळ्या. एकदम वीज येते )....तरुण पिढीवर आहे !....म्हणून....

शेवटी....जाता जाता....मी एवढंच म्हणेन....तरुणांना एक आवाहन करीन....की समाज तुमच्याकडे आशेनं पाहतो आहे.... गुणसंपन्न व्हा, नीतीसंपन्न व्हा, पौरूषेय व्हा आणि नेतृत्वाची ही धुरा समर्थपणे पेलून दाखवा. थँक यू! (टाळ्या) (कुणीतरी येऊन हार घालत असतानाच प्रकाश कमी कमी; डावीकडे प्रकाश.)

(प्राध्यापक ट्रकच्या क्लीनर साइडच्या दरवाज्यात उभे आहेत. तरुण खाली उभा राहून टाळ्या वाजवतो आहे.)

तरुण .... करता ना सुरुवात! (प्राध्यापक आंत जाऊन बसतात. ड्रायव्हर येतो. तरुण बसतो.)

(शांतता. ट्रक चालू आहे.)

ड्रायव्हर .... (प्राध्यापकांना—) तुमच्या बीबीला पण काय तरी ॲक्सिडंट झाला बोला नं?

प्राध्यापक.... हूं! बहुतेक!

ड्रायव्हर .... क्या हुआ?

प्राध्यापक.... काही कल्पना नाही.

ड्रायव्हर .... मतलब? मालूम नहीं?

प्राध्यापक.... मला नुसताच मेसेज मिळाला. अधिक काहीच कळलं नाही.

ड्रायव्हर .... अपनी बीबीको कुछ हुआ होता तो अपना दिल भी ऐसाच ब्रेकडाऊन होता!

प्राध्यापक .. अहो, सहाजिकच असतं ते! पण ह्यांना बघा ना, चेष्टाच वाटते सगळी!

ड्रायव्हर .... बच्चा है! शादी भी नहीं हुआी अभी!

प्राध्यापक .... तेच तर! तुम्ही.... ?

तरुण .... 'मिस्टर क्ष' म्हणा!

प्राध्यापक .... (दुर्लक्ष करीत) लग्न नसेल ना झालं?

तरुण .... झालेलं नाही! करीन असं वाटतं नाही! माणसात बांधून रहाणं जमणार नाही.

प्राध्यापक.... ( आवंढा गिळून ) अरे वा: ! तुमचे विचार इतके चांगले असतील अशी कल्पनाच नव्हती ! सहमत आहे मी तुमच्याशी !

तरुण .... डोन्ट ब्लफ ! प्रोफेसर, डोन्ट ब्लफ ! खरं तर, हे सगळं ऐकून तुम्ही आतल्या आत ढासळला आहात ! मग कशाला ही बुजवा–बुजवी ! कशाला ढोंग !

ड्रायव्हर .... अरे दोस्त ! तू एकदम काय बिगडला साला ! आँ ? जरा भेजा ठंडा कर ! चल ! खडकी बझारमें कुछ खा लेंगे !

( ट्रक थांबते. ड्रायव्हर व तरुण उतरतात. )

ड्रायव्हर .... अरे मास्तर ! तुम आते नहीं ? अच्छा बाबा ! हम अभ्भी आते है ! ( विंगमध्ये जातात. डावीकडे अंधार. उजवीकडे सर्वात वरच्या लेव्हलवर प्राध्यापक फक्त अंडरवेअरमध्ये, चट्टयापट्टयांच्या ! हात आडवे धरून उघडं अंग झाकण्याच्या प्रयत्नात. )

प्राध्यापक.... आयुष्य बोचरं आहे, आयुष्यात अडकून माझे सगळे कपडे फाटले. आयुष्य नागवं आहे. हे उघडेपण मला पेलत नाहीये. हा भगभगित प्रकाश बघवत नाहीये. मला कपडे द्या. अंग झाकायला काहीतरी द्या. ( गुडघे टेकतात. ) विनंती आहे कळकळीची; भीक मागतोय. दे दान सुटे गिरान–दे–दान–सुटे–गिरान–( कुणीतरी येऊन कफनी अंगावर चढवतो. ) ( उठून–हाताने आशीर्वाद देत– ) आयुष्याला किंमत नसते पण आयुष्य अटळ असतं. जगण्यासारखं काही नसलं तरी जगावं लागतं. जगणंच ते ! असं काय नी तसं काय ! जगलं म्हणजे झालं ! मन जगवणं साऱ्यानाच जमत नाही ! इतरांनी मन मारून शरीर जगवावं ! तेही जगवलं नाही, तर....तर....काही अनंत प्रश्न उभे राहतात ! मी कोण ? मी कसा झालो ? का झालो ! ही माणसं कां जन्मतात ? पहिला माणूस का जन्मला ? ( कोणीतरी हार घालतो. ) इतिहास–इ. स. पूर्वी....इ. स. नंतर....शके.... समाज....कळप....विवाह....अलेक्झांडर–द ग्रेट....युद्ध....एडवर्ड-

द फर्स्ट... वेश्याव्यवसाय....खून ...बलात्कार....तत्त्वज्ञान....एथिक्स ... सत्कार....फाशी .... राणी एलिझाबेथ....पहिले जागतिक महा-युद्ध....अंजू ...मी....प्राध्यापक....लेडीज ॲन्ड जंटलमन....( हलकेच टाळ्यांना सुरुवात. लयबद्ध टाळ्या भजनासारख्या. ) चारित्र्य.... सेक्स.. .मतप्रणाली....नेतृत्व....जनरली....पत्नी....मे आय से.... मे आय से ( विंगमध्ये जोरदार आणि वाढत्या लयीच्या टाळ्या ) आयुष्य. ...आयुष्य.....जीवन.... जीवन.....आयुष्य.. ..आयुष्य..... ( हळूहळू लाइट फेड अप. डावीकडे प्रकाश. प्राध्यापक एकटेच खाली मान घालून बसले आहेत. )

( ड्रायव्हर आणि तरुण परततात. )

तरुण .... व्हेरी सॉरी ! एक्स्ट्रीमली सॉरी ! काही परिचय नसताना मी फारच बोललो ! मला वाटलं होतं तुम्ही स्पोर्टीव्हली घ्याल ! माझ्याबरोबर वाद घालाल ! फरगेट इट् ! ( ड्रायव्हरला— ) देखो ! पूनामें कितने दिन ठहरेंगे ?

ड्रायव्हर .... कल सुबहतक !

तरुण .... फिर ?

ड्रायव्हर .... ( हंसतो ) अरे यार ! मालेगाव जाऊं तो दो—तीन दिन ठहरताही हूँ ! बीबी है हमारी वहाँ ! ( हंसतो. ) मालेगांव—म्हणजे आपुनका साला हनीमून....!

तरुण .... तो बम्बई नहीं जाएँगे ? कोई बात नहीं ! हम ट्रेनसे वापस जाएँगे कल !

ड्रायव्हर .... इतनी जल्दी ?

तरुण .... हां ! पूना तो सिर्फ कुछ दोस्तोंसे मिलने आया हूँ ! और फिर मौत का कुछ भरोसा नहीं तो जल्दी जल्दीही जीना पडता है, भाई ! ( प्राध्यापक त्याच्याकडे बघतात. प्राध्यापकांना— ) सच ! अरे हो ! आमच्या कहाणीची लेटेस्ट डेव्हलपमेंट सांगितलीच नाही नाही का

तुम्हाला ? त्याचं काय झालं ! आमचं बस्तान मुंबईत ठीक बसलं म्हणून म्हटलं वडलांना आणि बहिणीला मुंबईत आणावं ! उगीच कलकत्त्यांत—त्या धकाधकीत कशाला ठेवायचं ! पण तेही नव्हतं जमायचं.! कलकत्त्याला-बरं का ? सामान—बिमान बांधून ठेवलं आणि टॅक्सी आणायला बाहेर पडलो ! परत येतो तेवढ्यात....

ड्रायव्हर .... मर्डर ? दोनोंका ? क्या यार ? तुझी तर सगळी कहाणीच बुरी बन गयी ! आपुनको ऐसा होता, तो उन गुंडोका साला गला घोट दिया होता ! साले . ..

तरूण .... मी तेच केलं आहे !

(ड्रायव्हर नुसता वळून पाहून पुन्हा समोर पहातो. तरूण, प्राध्यापकांना सिगरेट ऑफर करतो. प्राध्यापक नाकारतात. ड्रायव्हर घेतो.)

तरूण ... तुम्हाला कुठं सोडायचं ? शहरात पोचतोय आपण; हॉस्पिटलपे छोडेंगे साबको !

ड्रायव्हर .... अरे क्यूं नहीं ?

तरूण .... कोणतं हॉस्पिटल ?

प्राध्यापक.... (एकदम) रुक जावो, रुक जावो ! हम यही पे उतरेंगे !

तरूण .... अहो, पण ....

प्राध्यापक .... (ड्रायव्हरला) ठहरो !

(ड्रायव्हर एकदम ट्रक उभी करतो.)

प्राध्यापक.... थँक यू !

(प्राध्यापक उतरत असतानाच)

तरूण .... मी दीपक मित्रा ! एम्. बी. बी. एस् . ! आणि सध्या वॉन्टेड ! खुनी ! लक्षात राहील ना ? नाही राहिलं तरी डझंट मॅटर ! पुन्हा भेटूच असं नाही ! बाय् !

(ट्रक जाते. प्राध्यापक विमनस्क स्थितीत उभे. थोड्या वेळानं जड पावलाने विंगमध्ये जातात. उजवीकडे प्रकाश. प्राध्यापक

पिकनिकला होते त्या लेव्हलवर– खालच्या ! हॉस्पिटलमधल्या खुर्चीत. विंगमधे बायको कॉटवर झोपली आहे) [ आवाज– ' तुझी पण कमाल आहे हं ! वहिनींचं हे .... हे माहिती आणि हॉस्पिटल म्हटल्यावर घाबरलास ! मीही गाढवच म्हणा ! मॅटर्निटी होम म्हटलं असतं तर काय बिघडत होतं ! असो. कॉंग्रॅच्युलेशन्स ! ' विंगमधून–पोक्त स्त्री– ' अपुऱ्या दिसांची बाळंत झाली, पण सुखरूप आहेत हो बाळ बाळंतीण ! ' ]

प्राध्यापक .... ( जड आवाजात ) अं ? हो ! मुलगा पाहिला ना ! .... माझ्या वळणावर ना ? असेल .... असेल ....

( प्रकाश कमी कमी होत–पडदा. )

C १४२६ ग्रा.वा.वि.
३८८१ १९/३/७४

# पुरुष

[ एक लाकडी बरॅक. समोर डाव्या हाताला बाहेरून आत यायचा दरवाजा. आत्ता तो बंद आहे. स्टेजच्या उजव्या भागात एक उंचवटा असून त्यावर एक खाट आहे. बाकी जुजबी सामान. टेबल-खुर्ची, बाकडे, हँगर्स अडकवलेली दोरी, मध्यभागी रॉकेलचा दिवा त्याला ब्राऊन पेपरचा कागद लावला आहे.

पडदा उघडतो, तेव्हा स्टेजवर पूर्ण अंधार आहे. हळूहळू पात्रलांचे आवाज जवळ येतात. दरवाजा उघडल्याचा आवाज. एक व्यक्ति पुढे येऊन काडेपेटीने दिवा पेटवते. दिव्याच्या प्रकाशात ती व्यक्ति व्हिएतनामी मुलगी असल्याचे दिसते. दरवाज्यात एक उंचापुरा तरूण–लष्करी गणवेशात–उभा आहे. ]

तरुणी .... हूँ ( हातानं " आत ये " अशी खूण करते. )

तरुण .... ओह् छान ! छान ! ही माझी खोली तर ! अं .... दिवा जरा मोठा करता का ? प्लीज ! ( तरुणी दिवा मोठा करते. ) थँक्स ! मार्व्हेलस ! ( तरुण खांद्यावरचं सामान दरवाज्याशेजारीच उतरवून ठेवतो. खुर्ची झटकून मोकळेपणी बसतो आणि सिगरेट शिलगावतो. )

तरुण .... एअरपोर्ट वरुन निघताना वाटलं नव्हतं इतकं चालायला लागेल म्हणून ! भलतंच लांब आहे ! पण, झकास ! इट् वॉज अ नाइस वॉक ! इतके दिवस रटाळ ऑफिस वर्क करून अंग आंबलं होतं ! बस्स् , आता कसं फ्री वाटतंय एकदम ! मार्व्हेलस ! ( तरूणी यांत्रिकपणे त्याचं सामान शक्य तितकं जागी लावते आहे. )

तरुण .... ओह ! राहू दे ! राहू दे ! इटस्, ऑफुली गुड ऑफ यू ! मी लावीन ते थोड्या वेळानं ! ( सिगरेटचा दीर्घ झुरका घेतो. ) अं. .... इफ यू वॉंट माईंड ! जाण्यापूर्वी मला काही तरी रिफ्रेशिंग देऊन जाल का ? मी भयंकर दमलोय ! तो प्रवास आणि हे चालणं ....

( तरुणी त्याच्या बॅगेत काही तरी शोधू लागते. )

तरुण .... मे बी अ कप ऑफ कॉफी !

तरुणी .... ( अतिशय आश्चर्याने ) येस ?

तरुण .... नाही, नसेल तर चालेल. अ ग्लास ऑफ वॉटर वुड डू !

तरुणी .... ( हंसत ) तुम्ही आणायला विसरलात तरी हरकत नाही. मला एम्ब-सीची सक्त ऑर्डर आहे, की आपल्याला काही कमी पडू द्यायचं नाही. मी आत्ता तजवीज करते. एक्स्क्यूज मी ! ( तरुणी जाते. )

( तरुणी जाताना अशाच प्रकारे जाते की कोणाचीही नजर बद्ध व्हावी. तरुणही ती दिसेनाशी होईपर्यंत पाहात राहतो. नंतर डोळे मिटून सिगरेटचा आस्वाद घेत बसून राहतो. तरुणी येते तेव्हा तिच्या हातात वाइनची बाटली आणि एक पेला आहे. पेला टेबलावर ठेवून ती वाइन ओतत असताना तरुण डोळे उघडतो. )

तरुण .... ( एकदम )– ओह नो ! ओह नो !

( तरुणी दचकते; थांबते )

तरुण .... आय नेव्हर ड्रिंक ( सिगरेटचा झुरका घेतो. )

तरुणी .... कम ऑन ! डोंट बी जोकिंग ! ( पुन्हा ओतू लागते. )

तरुण .... रिअली ! बिलिव्ह मी ! ती ओतून टाका ! मी पीत नाही ! कधीच नाही ! ( ती थांबते. बाटली खाली ठेवते. ) नाही तर, नाही तर– तुम्ही प्या ! पीत असाल तर–( तरुणी भांबावली आहे. काहीच न सुचून ती बाकड्यावर जाऊन बसते. विचित्र स्तब्धता. दोघंही एक-दम " सॉरी " म्हणतात, मग– )

तरुण .... आय ॲम सॉरी ! मी आपल्याला दुखावलं ! आय ॲम रिअली सॉरी !

तरुणी .... ( विचित्रपणे ) ओह–नॉट ॲटॉल ! नॉट ॲटॉल !

( थोड्या वेळाने ) तुम्ही पीत नाही ? खरोखरीच ?

तरुण .... कधीच नाही ! अजून मी स्पर्शही केला नाही दारूच्या थेंबाला !

तरुणी .... तुम्ही .... सैन्यांत किती वर्षे आहांत ?

तरुण .... चार – साडेचार वर्षे ! का ?

तरुणी .... नाही ! ( स्तब्धता. )

( दरवाज्यावर टकटक, दोघंही एकदम वळून पाहतात. एक अमेरिकन तरुण नाईटगाऊनमध्ये उभा आहे; चेहरा रापलेला. )

अमेरिकन.... Hi ! Excuse me ! Hope you are not disturbed ! ( डोळा मारतो. ) Let me introduce myself ! this is Capt. John Newcombe jr..

तरुण .... ( shakehand करीत )– Very glad to see you; I am..

अमेरिकन.... I know ! you are Major Omkar Deepak, special observer of the United Nations ! Am I right ? By jove, very very glad to see you major !

तरुण .... ( तरुणीकडे निर्देश करून ) and Captain meet ...

अमेरिकन.... Oh ! dash it ! There's hardly any charlie who doesn't know this sweet chocolate ! Hi–Sweetee, how do you do ?

तरुणी .... Fine, you damn heap of flesh, how do you do ?

अमेरिकन.... Oh ! very bad ! Feelimg very lonely you kwow ? No wine and no......

तरुण .... ( एकदम– ) Oh ! There you are ! ( बाटलीकडे बोट करतो. )

अमेरिकन.... Extremely kind of you ! May I share it ?

तरुण .... Share ? Take the whole of it !

अमेरिकन.... By Jove ! ( आनंदानं बाटली घेतो. )

तरुणी .... No, major ! That was the only one left with me !

तरुण .... Don't worry ! I'll pay for it !

अमेरिकन.... Oh, sweettee, darling ! Let me have at least a few hot pegs ! It's a deal you know; major will be having hot legs ... & I...

तरुणी .... Shoot, you bastard !

( अमेरिकन तिच्या गालावर टिचकी मारून जाता जाता– )

म. प्र. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
अ. क्र. १५०८० दि ........
क्र. ........
वर्ग ........

अमेरिकन .... See you major ! Bye ! Bye sweettee ! Good night !
( दरवाज्यातून पुन्हा वळून– ) Sweet night dear !
( तरुण दरवाज्यापर्यंत जाऊन, हात करून माघारी वळतो. तरुणी पाठमोरी उभी )

तरुण .... ( स्वतःशीच ) जॉली माणसं ! हे अमेरिकन्स....

तरुणी .... ( तिरस्काराने ) हूंऽऽ !

तरुण .... मी इतके अमेरिकन्स पाहिले ! कोणीही चेहऱ्यावर दुःखी, ओढलेला नाही ! एखाद्या अंत्ययात्रेतसुद्धा वाटतं हे अमेरिकन्स हळूचकन् काही तरी कॉमेंट करून कुणाला डोळा घालतील. मला वाटतं–

तरुणी .... मला वाटतं, अमेरिकन माणूस फक्त हाडाचा आणि भरपूर मांसाचाच बनलेला असतो. हृदय वगैरे निरुपयोगी अवयव त्यांच्यात असतच नाहीत.

तरुण .... तुमचं फारच कटु मत दिसतंय ह्या लोकांविषयी !

तरुणी .... ( एकदम वळून– ) का नसावं ? कोण कुठचे लोक हे ! स्वातंत्र्याचा कैवार घेऊन आमच्या इथे आ... ! ना आमच्या रक्ताचे, ना आमच्या मातीतले ! नरक करून टाकला .... ( प्रयासानं आवरून बळेच खोटं हसते. ) ओह ! सॉरी ! .... जेवण कुठे घेणार तुम्ही ? मेसमध्ये का इथंच मागवू ?

तरुण .... अं ? कसंही ! माझी मेसमधे यायला काही हरकत नाही !

तरुणी .... नकोच पण ! मला वाटतं तुम्ही इथंच घ्यावं जेवण !

तरुण .... नाही, अहो कशाला ? आणि तुम्ही कशाला तसदी घेताय ?
( तरुणी जात आहे. ) मी जाईन मेसमध्ये आणि तुम्हालाही उशीर होतोय् . इटस् ... ( तरुणी जाते. )
[ तरुण दुसऱ्या दरवाज्याने आत जातो. हातपाय धुवून बाहेर येतो. बॅग उघडून कसली तरी फ्रेम काढून टेबलावर ठेवतो. उदबत्ती काढून पेटवतो. टेबलात खोचतो. डोळे मिटून नमस्कार करतो आहे..

तरुणी कधी मागे येऊन उभी आहे कळत नाही. तरुणी आश्चर्यानं हे सारं पहाते आहे. तरुण उठून लोटांगण घालण्यासाठी पाय पसरतो ते तरुणीला लागतात. ]

तरुण .... अं.... सॉरी !

तरुणी .... ओह दॅटस् ऑल राइट ! ( फ्रेमकडे निर्देश– ) हे काय आहे ?

तरुण .... आमचा देव ! भारतात–आम्ही राहतो त्या भागात ह्या देवाची पूजा करतात ! ह्याला गणपती किंवा गजानन म्हणतात !

तरुणी .... इज् ही डेड ?

तरुण .... ( ओरडतो– ) व्हॉट ?

तरुणी .... मी काही लागेल असं म्हणाले का ? सॉरी ! मला वाटलं फ्रेममध्ये फोटो आहे, कदाचित् ....

तरुण .... मला वाटतं, मी काय म्हणालो तुम्हांला नीटसं कळलं नाही. ( फ्रेम तिच्या हातात देत– ) पहा ना ! हा आमचा देव आहे.

तरुणी .... ( पाहून थोड्या वेळाने हसत सुटते ) अहो, त्या अमेरिकन्सचा देव बरा की हो ! माणसासारखा आहे ! हे काय ? ( हसते. ) हा हत्तीसारखा—

तरुण ... स्टॉप इट् ! नॉन्सन्स !

तरुणी .... ( एकदम गंभीर होत. ) सॉरी ! मी .... मला माफ करा ! मी चुकून .... खरंच ( विचित्र स्तब्धता. )

तरुण .... देवाची अशी विटंबना करू नये ! तुमचेही देव असतीलच की !

तरुणी .... एक विचारू ?

तरुण .... अं ?

तरुणी .... देव म्हणजे काय ?

तरुण .... ( सहजपणे ) देव म्हणजे—( एकदम लक्षात येऊन– ) देव म्हणजे ( स्तब्धता ) ( मोकळेपणी हसून ) ओह गॉड ! एवढ्या साध्या प्रश्नाचं उत्तर इतकं अवघड असेल असं वाटलं नव्हतं ! देव ही

कल्पना, देवाचं अस्तित्व इतकं गृहीत धरलेलं जीवनात ! की कधी असा प्रश्न .... ? खरंच ! तुम्ही मला एकदम कोंडीत पकडलंत ! ऐनी वे, मी प्रयत्न करतो ! हे सगळं जग .... किंवा सगळं विश्व म्हणू हवं तर ! हे ज्या एका अदृश्य शक्तीवर चाललं आहे .... आय मीन जी शक्ति हे सगळं नियंत्रित करते आहे ! त्या जग-नियंत्याचे प्रतीक .... छे ! मला वाटतं मी फार गोंधळ करतोय ! ( थोड्या वेळानं ) ठीक आहे ! असं पहा ! आपण मानव किती लहान, असमर्थ आहोत ह्या निसर्गापुढे ! ही उत्तुंग शिखरं,.... प्रचंड समुद्र .... ओह ! इट् सीम्स् होपलेस ! ( तरुणी हसते. ) नाही हसू नका ! हे काही तरी अगदी दिसतंय, कळतंय ... पण शब्दात पकडता येत नाही ! असं झालंय !

तरुणी .... तसं काही नाही ! शब्दांचा आधार मिळत नाहीये म्हणा ! देव ! मला वाटतं, पोटभर जेवण झाल्यावर, उपाशी माणसाला उपदेशामृत पाजायला जे विषय लागतात, त्यातला हा एक खमंग विषय असावा !

तरुण .... मला सांगता येत नाहीये, हे क्षणभर सोडा ! पण जी कल्पना शाश्वत आहे, चिरंतन आहे, त्याला असं क्षुद्र मानणं हे काही बरोबर नाही !

तरुणी .... क्षुद्र ? तुम्ही कधी, कशाचा, कसा विचार करतां हे परिस्थितीवर अवलंबून असतं ! दहा दिवस उपाशी असणाऱ्या माणसाला जा बरं सांगायला देवाची महति ! तो म्हणेल—ते सगळं कबूल—चार घास अन्न देतोस का ? नाही तर तू आणि तुझा देव बसा झिम्मा खेळत—मला काय त्याचं ! आणि अन्न दिलंत तर-- ( एकदम अंतर्मुख झाल्यासारखी ) कशालाही देव मानायला तयार होईल ! अन्न देणाऱ्या सैतानालाही देव मानून पायाशी लोळण घेतील त्याच्या ! ( एक विमान घडाडत जाते. ती चटकन् दिवा विझवते. पुन्हा पेटवते. )

तरुण .... माय गॉड ! आपण कुठून कुठे पोहोचलो ! फुकटच डोकी शिणवली ! खरं सांगू ? तुम्ही इतकं चांगलं बोलत असाल असं वाटलं नव्हतं ! माफ करा, पण तुमच्याकडे पाहून मला वाटलं होतं की असल्या चर्चेत सहज लोळवीन तुम्हाला !

तरुणी .... (हसते) मीसुद्धा आश्चर्यचकीत झालेय ! मी इतकं बोलू शकते हे मलाही प्रथमच कळलं आज !

तरुण .... तुमचे विचार तर खूपच मॅच्युअर्ड वाटले पण !

तरुणी .... असतील ! कांही कल्पना नाही ! आणि मी काही विशेष बोलले असं नाही वाटलं मला ! तुम्ही उगाच स्तुती करताहात माझी !

तरुण .... छे हो ! उगाच नाही ! खरंच, बाय हार्ट !

तरुणी .... पुष्कळ दिवस कोंडलं होतं हे सगळं मनात ! आज बोलले इतकच ! पण बोलले ह्याचंच आश्चर्य वाटतंय ! वाटलं होतं खोट्या हास्याचे बांध घातलेत ते एव्हांना खूप मजबूत झाले असतील ! पण नाही ! कच्चे दुवे आहेत कुठं कुठं !

तरुण .... हे मात्र मीही ओळखलंय ! मगाशी तुम्ही बोल्लात ते इतक्या पोट-तिडकीनं की मला वाटलं आता तुम्ही रडणार !

तरुणी .... (हसते) रडणार ? मी ?

तरुण .... इतकंच नव्हे, तुम्ही फार मोठं दुःख, फार टोकदार यातना खूप दिवस दडवल्यात त्या धरण फुटल्यासारख्या धोधावत बाहेर पडणार असं उगाचच वाटून गेलं मला !

तरुणी .... असं तुम्हाला खरंच वाटलं ? (थोड्या वेळाने) राग मानू नका — पण मला सारखा संशय येतोय की तुम्ही सैन्यात नाहीच आहात. कुणीतरी सद्‌गृहस्थ चुकून हा ड्रेस घालून आलाय् ! आणि तुम्ही असे वेगळे वाटलात म्हणूनच मी बोलले ! (विचित्र हंसत) कुणी रिपोर्टर असेल इथं तर तो नोंदवून ठेवील ही घटना ! एक तरुण व्हिएतनामी मुलगी रात्री नऊ ला एका सैनिकाशी **बोलत** बसलेली

आढळली ! ह्या गुन्ह्याबद्दल तिला गोळी घालून—( विमान धडधडत जाते. पुन्हा तेच. ती दिवा घालवते. पुन्हा लावते. )

तरुणी .... डॅम इट ! मी तुमचा मूड तर खराब केला नाही ना कॅप्टन ?

तरुण .... छे ! हे काय बोलणं झालं ? तुम्ही मला इथपर्यंत वाट दाखवलीत, इतक्या वेळ छान कंपनी दिलीत !

तरुणी .... खरं तर हे काहीच केलं नाही मी....

तरुण .... नाही, खरंच ! अहो, मला फार बोअर झालं असतं ह्या वातावरणात !

तरुणी .... ही खास भारतीय पद्धत दिसतेय् एखाद्याची भरमसाट स्तुति करून खूष करायची ! हो ना कॅप्टन ?

तरुण .... मेजर म्हणा !

तरुणी .... ओह ! सॉरी हं ! माफ करा !

तरुण .... ठीक आहे ! माफ केलं आहे ! पण आता तातडीनं जेवणाची सोय केली नाहीत तर मात्र माफ करणार नाही ! कोर्टमार्शल करीन !

तरुणी .... ( हंसत ) ओह नो ! ही आलेच पाहून—( जाते. )

( तरुण जरा वेळ उगीच इकडे तिकडे पाहतो, मग दरवाज्यातून दूरवर पाहतो. मग टेबलाशी येतो. बसतो. एकदम उठून ट्रंकमधून डायरी काढतो. एक पान उघडून– " दोन फेब्रुवारी. आजच्यासारखा दिवस कधी आल्याचं आठवत नाही. मला व्हिएतनाममध्ये जायला लागणार हे खूप दिवस माहीत होतं. आज संध्याकाळी सायगावच्या जमिनीला पाय लावला तेव्हा विमानात ज्या संमिश्र विचारांनी माझ्या डोक्यात काहूर उठवलं होतं ते एकदम कुठल्या कुठं लुप्त झालं. इथल्या सैनिकांनी आणि व्हिएतनामी लोकांनी अतिशय प्रेमानं स्वागत केलं म्हणूनच नव्हे तर त्या हिरव्यागार झाडाझुडपांनी, दूरवरच्या अंधुक डोंगरकडांनी माझं मन मोकळं झालं, फुलून आलं म्हणून आणि म्हणूनच मी जीप नाकारली. चालतच निघालो. बरोबर .... अरे काय गंमत आहे, त्या तरुणीचं नावच विसरलो मी,

ती व्हिएतनामी तरुणी वाट दाखवत होती ! मुद्दामच तिला मी पायवाटेनं, चढउतारानं जायला सांगितलं ! निसर्गाच्या त्या ओला-व्यात आणि आपलेपणात मी हरवून गेलो ! शाळेत असताना सुट्टी लागली की गावी जायला मन वेडं व्हायचं ! आत्ता तर ती ओढ फारच तुफानी लागली होती ! शहरी जीवन, खोटे–नाटे ढोंगी शिष्टाचार, सभ्यासभ्यतेचे बुरखे, बुरख्याआडचे चोरटे चाळे ह्यांनी वीट आला होता ! ऑफिसमधल्या कामानं तर यंत्रच बनून गेलो होतो ! आज मनमुराद आनंद लुटला ! हातात एक बारीक काठी घेऊन कडेच्या झाडाझुडपांना झोडपलं ! जुनी जुनी छान गाणी गुणगुणत, कधी तालावर चालत, कधी हलकेच नाचत मी इथवर आलो ! आतून अगदी आनंदाचं उधाण आल्यासारखं वाटलं ! मी आज जीवन अनुभवलं ! जीवनाचा साक्षात्कार घडला ! .... ”

तरुणी .... मेजर ....( तरुणी येते. ) ! खाना हाजिर है ! अरेच्या, तुम्ही लिहित होतात ....

तरुण .... हो ! कोर्ट मार्शलची ऑर्डर ! ( दोघंही हसतात. )

तरुणी .... ( हसतच-- ) रद्द करा हं ती ! प्लीज !

तरुण .... हो ! पण एका अटीवर !

तरुणी .... आता अट कोणती ? जेवण आणलंय मी !

तरुण .... तेच ! शक्य असेल तर तुम्हीही इथंच जेवा माझ्याबरोबर !

तरुणी .... नो ! थँक्यू !

तरुण .... नाही ! संकोच करू नका ! मी जेष्ठ-कनिष्ठ मानीत नाही ! आणि शिवाय, खरं सांगायचं तर मला इतक्या चांगल्या कंपनीची अपेक्षाच नव्हती !

तरुणी .... छे हो ! संकोच कसला ? जेवलेही असते, पण मला भूक नाही ! आज संध्याकाळी इथं पार्टी झाली, तेव्हा खूप खाणं-पिणं झालंय !

तरुण .... तरीपण थोडंसं ....

तरुणी .... नाही खरंच नको ! सांगितलं ना मी लाजणार नाही ! लाजता येतच नाही मला !

तरुण .... ओ के ! ( थाळी पुढे ओढतो. खायला लागतो. ) पार्टी कसली होती म्हणालात ?

तरुणी .... पार्टीला काय निमित्त लागतंय ! रोज कशान् कशाची पार्टी ! खाणं पिणं प्रमुख ! आज त्या मगाशी आलेल्या जॉनचा बर्थ डे होता !

तरुण .... ओह ! आय सी !

तरुणी .... पण आज नेमकी मी तुमच्या सरबराईला ! भलता नाराज झाला ! म्हणाला " Ok ! let us postpone the celebration " ( तरुणाला एकदम ठसका लागतो. ती पाण्याचा ग्लास भरून देते. ) टेक इट ईझी मेजर, ईझी !

तरुण .... नो दॅटस ओ के ! आठवण काढली कुणी तरी !

तरुणी .... म्हणजे ?

तरुण .... आमच्याकडे असा ठसका लागला की कुणी तरी आठवण काढली असं म्हणतात !

तरुणी .... मग तुमच्या बायकोनं काढली वाटतं आठवण ?

तरुण .... बायको ? ती कुठली आठवण काढत्येय ! चांगली खुषीत झोपली असेल थोडे दिवस जाच नाही म्हणून ! ( दोघंही हसतात, हळूहळू प्रकाश कमी, अंधार. थोड्या वेळानं प्रकाश येतो. जेवण झालं आहे. तरुण हात धुवून खुर्चीत येऊन बसला आहे. सिगरेट पेटवता पेटवता– )

तरुण .... ओह छान ! इतकं सुंदर जेवण आणि मिलिटरी मेसमध्ये ! माझा विश्वासच बसत नाहीये !

तरुणी .... आम्ही व्हिएतनामी लोक प्रसिद्धच आहोत आदरातिथ्याबद्दल !

तरुण .... ते तर उघडच आहे ! उगाच का इतकी वर्षे ठेवून घेतलत ह्या पाहुण्यांना !

तरुणी .... पाहुणे कुठले ? मालकच ते ! (थांबून) तुम्ही निरीक्षक म्हणून आला आहात ?

तरुण .... हूं !

तरुणी .... किती दिवसांचा दौरा ?

तरुण .... तसं कांही बंधन नाही ! फक्त दर आठवड्याला रिपोर्ट पाठवायचा ! आणि परत बोलावलं की जायचं !

तरुणी .... रिपोर्टस् छापलेलेच असतील !

तरुण .... व्हाट डू यु मीन ? मी लिहिणार आहे —

तरुणी .... (विस्मयानं) तुम्ही खरोखरीच पाहून लिहिणार ?

तरुण .... म्हणजे ? त्यासाठी तर माझी नेमणूक ! अमेरिकेत यूनोचं ऑफिस आहे म्हणजे काही अमेरिकन्सबद्दल विशेष प्रेम बाळगत नाही मी ! मी निरीक्षण करणार ते तटस्थपणे !

तरुणी .... अगदी बरोबर ! म्हणजे कुणाच्याच बाजूनं नाही ! कुणाचंच कौतुक किंवा सोयरसुतक नाही !

तरुण .... एक मिनीट हं ! तुमचा काहीतरी राग दिसतोय ! प्लीज सरळ सरळ सांगा ना ! अजिबात घाबरू नका !

तरुणी .... तुम्ही खरोखरीच निरीक्षण करायचं म्हणताय, म्हणून सांगते ! तुमच्या मनातले काही काही शब्द तुम्हाला वगळावे लागतील ! ते इथं अर्थशून्य आहेत ! उदाहरणार्थ, घाबरणे ! मनुष्य जास्तीत जास्त कशाला घाबरेल ? मृत्यूला ! इथं मृत्यू ही सहज साध्य गोष्ट आहे ! आणि मृत्यूनं तसं अप्रुप नाही कुणाला, जीवनाचंही नाही ! जीवन आणि मृत्यू ह्यामधली सीमा फार अस्पष्ट झाली आहे ! आत्ता जिवंत आहोत, कारण मघाशी मेलो नाही ! ही नरकपुरी आहे ! सर्व प्रकारचे मृत्यू इथं क्षणोक्षणी घडतात ! स्फोटात मृत्यू, भोसकून मृत्यू, भाजून मृत्यू, वडलांना फाशी, आईचा अत्याचारानं मृत्यू, धाकट्या भावाचा अन्नावाचून मृत्यू ! .... काढा दोषी कोण ! कोणी बनवलं या आमच्या सुंदर मातीचं वाळवंट ?

तरुण .... मी जरूर कळवीन सगळं ! मी पाहीन ते जसंच्या तसं लिहून पाठवीन !

तरुणी .... काही उपयोग नाही मेजर ! इतकी वर्षं थोडे का निरीक्षक झाले ! थोड्या लोकांनी का ह्या युद्धाचा निषेध केला ! काय उपयोग झाला ? हे कुण्या एक दोघांच्या हातचं काम नाही !

तरुण .... पण अमेरिकन्स इथं तुमच्या मदतीला आलेत ना ?

तरुणी .... कुणीही बोलावलं नव्हतं ! आमचं आम्ही पाहिलं असतं ! खरं तर, सुरवातीला आम्हालाही असंच वाटलं ! हे मित्र मदतीला आले म्हणून आनंद वाटला ! पण नंतर ते सोंग गळून पडलं ! सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी राज्य सुरु केलं ! आमच्या घरात आम्हीच गुलाम झालो !

तरुण .... पण शेवटी....

तरुणी .... कधी येणार आहे तो शेवट ! मी तळमळून वाट पहाते आहे ! प्रत्येक व्हिएतनामी त्याच शेवटाची आशा करताना हळूच स्वतःच नष्ट होत आहे ! युद्ध संपतच नाही ! पण नाही, युद्ध संपून चालणारही नाही ! युद्ध आता फार अंगवळणी पडलंय् ! युद्ध आहे म्हणून इतकं तरी जगतोय् !

तरुण .... तुम्हांला खूप वाईट अनुभव आलेत ! खूपच सहन केलंय तुम्ही !

तरुणी .... ( मंद हसत– ) अर्थही बदलून गेले आहेत आमच्या भाषेतले; आत्ता तुम्हाला सांगितली ही हकीकत आहे ! – आणि तुमच्यासारखा एखादा माणूस भेटणं हा अनुभव आहे ! काय सांगायचं तुम्हांला—हे असले अनुभवच सहन होत नाहीत ! ( स्तब्धता. )

तरुण .... तुम्हांला कोण वाटतं दोषी आहे ?

तरुणी .... पुरुष !

तरुण .... नाही समजलं !

तरुणी .... पुरुषाची भूक सैतानाची असते ! राज्यकर्त्या पुरुषाची सत्तेची भूक,— अधिकाराची भूक, प्रसिद्धीची भूक ! महत्वाकांक्षी पुरुषाची विजयाची भूक, दुसऱ्याच्या रक्ताची भूक ! सामान्य पुरुषाची साधी शरीराची भूक ! ह्या भुकेच्या अग्नित बाकी साऱ्याची होळी ! सौंदर्याची, निरागसतेची, प्रेमाची, श्रद्धेची, शांततेची, सुखाची होळी ! विचारणार कोण ? सांगणार कुणाला ? स्त्री ? कोण ? सिगरेट, आरामखुर्ची, दारुची बाटली—तशी स्त्री !

( स्तब्धता. तरुण डोक खाली घालून, डोळे मिटून हात कपाळाशी मिटून ऐकतो आहे. शांततेमुळं एकदम भानावर येऊन वर पाहतो. तरुणी दरवाज्याशी गेली आहे. )

तरुणी .... एक मिनिट ! मी मेसमध्ये जाऊन वरी डबा गेलाय् का ते पाहून येते. ( जाते. )

( तरुण भांबावून बसला आहे. त्याचं डायरीकडे लक्ष जातं. पुढे लिहू लागतो—

" साक्षात्कार नव्हे ! जीवनाचं एक फसवं रूप होतं ते, असं आत्ता वाटायला लागलंय् ! काय योगायोग आहे ! मघाशी कोणत्या मनःस्थितीत लिहित होतो, आणि आत्ता मनात काय काय खळबळ माजली आहे ! मघाशी .... पुन्हा नाव विचारायला विसरलोच ! मघाशी जी माझ्याबरोबर आहे ह्याचं मला भानही नव्हतं त्या तरुणीनं माझ्या सगळ्या विचारांना एकदम हादरून सोडलं आहे ! आपल्या मनात खोलवर रुजलेल्या संस्कारांना आणि श्रद्धांना कोणी असं खडबडवलं तर फार कठीण होऊन जातं ! स्त्रीविषयीच्या आजवरच्या कल्पना म्हणजे छापील टेक्स्टबुकमधला जुना धडा होता असं वाटायला लागलं आहे ! भयंकर गोंधळ उडाला आहे ! ह्याला काही उत्तरच नाही का ? सगळे पुरुष फक्त असेच असतात का ? मी वेगळा आहे ! पण म्हणजे कसा आहे ? मी अमेरिकन

असतो; ऐन तारुण्यात मायदेश सोडून कुणाच्या तरी आज्ञेनं, परक्या मुलुखात लढायला आलो असतो; का लढतो हे माहीत नसताना समोरच्या माणसांचे मुडदे पाडत राहीलो असतो तर मीही पुढच्या क्षणाची शाश्वती नसल्यामुळं, आला क्षण उपभोगला असता ? असाच वागलो असतो ? की मुळात मी अमेरिकन नसून भारतीय आहे, हाच मोठा फरक आहे ! तशी पुढच्या क्षणाची शाश्वती कुणाला असते ? मी आत्तापर्यंत वेगळा वागलो तो कसा ? संतापलो का ? मीही पुरुष .... " तरुणी येते. )

तरुणी .... मेजर, पुन्हा लिहिताय ?

तरुण .... ( वळून ) हो ! रोजनिशी लिहितो मी ! आज जे जे अनुभवलं ते लिहित होतो !

तरुणी .... अच्छा ? मी वाचू काय लिहिलंय ते ?

तरुण .... मलाही कळलं नाही लिहिताना .... तुला काय कळणार ! कधी काळी हे कोडं उलगडलं तर जरुर लिहून ठेवीन !

( तरुणी जांभई देते. अंगाला आळोखेपिळोखे देऊन उजव्या कोपऱ्यातल्या कॉटकडे वळते. कॉटवर चादर घालू लागते. )

तरुण .... ओह् ! पुन्हा तेच ! राहू दे म्हटलं ना ! मी काय व्ही. आय. पी. नाही ! ( तरुणी मच्छरदाणी लावते. )

तरुणी .... तुमचं लिहून झालं की नाही ?

तरुण .... आज थांबवतो इथंच ! उद्या डोकं थंड झालं की लिहिन पुढे !

तरुणी .... ठीक ! तेच म्हणणार होते मी !

( तरुणी त्याच्यापुढे पाठमोरी उभी राहते. तरुणाचं लक्ष नाही. ती त्याला कोपरानं धक्का मारते. )

तरुण .... येस ?

तरुणी .... प्लीज !

तरुण .... प्लीज व्हॉट ?

तरुणी .... ( आश्चर्यानं ) प्लीज व्हॉट ? प्लीज हेल्प मी मेजर !
( ती बटणांकडे निर्देश करते. )

तरुण .... ( बटणं काढतां काढतां ) तुम्ही इथंच कपडे बदलणार ?
( उरलेली बटणं काढत, तरुणी कॉटकडे जाते. मच्छरदाणीत शिरून– ) ओह, कम ऑन ! डोंट बी जोकिंग !

तरुणी .... मी भयंकर दमले आहे !

तरुण .... अहो, पण....आता खूप उशीर झालाय ! साडे अकरा वाजत आलेत...

तरुणी .... तेच तर म्हणत्येय मी ! दरवाजा लावा पटकन् आणि येताना दिवा मालवून या !
( तरुण शहारतो. एकदम पुढे होऊन– )

तरुण .... हे पहा ! तुमचा गैरसमज होतोय ! मी—( शांतता )

तरुण .... प्लीज ! अंडरस्टँड मी !
( शांतता ).

तरुण .... प्लीज ! लीव्ह मी अलोन ! .... मी .... मी त्यातला नाही !
( शांतता. )

तरुण .... ओ के ! मी इथंच झोपतो आरामखुर्चीत !
( तरुणी " नॉन्सेन्स ! " असा उद्गार काढून अंगावर चादर पांघरुन मच्छरदाणीतून त्वेषानं बाहेर येते. )

तरुणी .... मी काय अर्थ समजू याचा ?

तरुण .... खरं तर हे मी तुम्हाला विचारायला हवं !

तरुणी .... शब्दच्छल नकोय ! तुम्ही काही कुक्कुलं बाळ नाही हे समजायला !

तरुण .... तुम्ही माझ्या भरीस पडू नका ! मी त्यातला नाही !....
गैरसमज होतोय तुमचा !

तरुणी .... मला आधी माहीत असतं तर वेळ वाया घालवला नसता फुकटच्या चर्चेत ! बौद्धिक चर्चा !

तरुण .... तुमचा हा हेतु कळता तर आधीच खबरदारी घेतली असती मी !

तरुणी .... हो, हो ! हेतु ! पोट भरण्याचा आणि कुटुंब पोसण्याचा अत्यंत स्वार्थी, नीच हेतु !

तरुण .... हे ढोंग आहे !

तरुणी .... मीच मूर्ख ! वेळीच जॉनकडे गेले असते तर जेवणाचीच काय एखाद्या नव्या ड्रेसचीसुद्धा सोय झाली असती ! बर्थडे साजरा करणार होता तो !

तरुण .... अजून जा !

तरुणी .... खूप उशीर झालाय, मेजर आणि उपदेश करू नका !

तरुण .... ( रागानं पाकीट काढून नोटा हातात कोंबतो-- ) घ्या ! मोजले नाहीत !

तरुणी .... ( रागानं फेकून देत– ) भीक नाही मागितली मी !
कुत्र्याच्या तोंडावर भाकरी फेकल्यासारखं करू नका !
दानधर्म करा ! एका असहाय्य तरुणीकडची स्वस्त वस्तू विकत घेऊन तिचा चरितार्थ चालवा !

तरुण .... मी असा फसणार नाही !

तरुणी .... वाटलंच होतं ! आधी मला संशय आला तुम्ही सैनिक आहात की नाही ! आता मला वाटतंय तुम्ही पुरुष आहात की नाही !

तरुण .... ( किंचाळतो– ) Shut up ! ( तिचे दोनही खांदे धरतो. इतक्यात विमान धडाडत जाते. ती शिताफीनं दिवा मालवते. अंधारात नुसतेच काही आवाज. एकदम तरुण ओरडतो ! " ओह माय गॉड्, यू आर नेकेड ! " पुन्हा काही आवाज.! हलक्या लयीत संगीत सुरु होऊन गति वाढते. शेवटी वाद्यांचा गदारोळ होऊन एकदम संगीत थांबते. स्तब्धता. )

( तरुणानं दिवा पेटवला आहे. स्टेजवर त्याचा शर्ट आणि गंजिफ्रॉक पडले आहेत. मच्छरदाणी बंद आहे. तरुण थबकला आहे. तिथला दारुचा ग्लास एकदम उचलून त्यानं रिकामा केला आहे. डोकं

धरून हेलपांडत तो टेबलाकडे गेला आहे. डायरीत—

" मीही शेवटी .... पुरुषच ! .... पण ह्यातच .... मला उत्तर सापडलंय ! पुरुषार्थ .... पराक्रमात आहे .... असमर्थांच्या रक्षणात आहे ... मी हरलो .... पण माझ्यातले हे संस्काराचे तंतु .... अजून जिवंत आहेत .... ते चिरंजीव आहेत ... ! मी हरलो .... हेही जिंकणारे आहेत ... ! अमेरिकन्स ... यू बास्टर्डस् ! .... हेही जिंकणारे भारतीय आहेत ! ... तुम्हाला नरकाच्या खाईतून . ..सोड-वायला ते .... देवदूत येतील ! .... पण .... मी हरलो ! ")

[ तरुण उठतो. बॅगेतून रिव्हॉल्व्हर काढतो. चार्ज करतो. स्वतःवर रोखतो. पुन्हा खाली ठेवून पुढे लिहितो ....

" मी भ्याडपणे मरत नाहीये .... वीराप्रमाणे प्रायश्चित घेतो आहे.... माझ्या मागे .... माझ्यासाठी कुणी रडू नका .... ही तरुणी .... तिचं नाव .... ? "

वळून मच्छरदाणीकडे पाहतो परत वळून—

" ही तरुणी दोषी नाही ...." रिव्हॉल्व्हर उडवतो. खाली कोसळतो. मच्छरदाणीत एकदम आवाज आणि हालचाल. तरुणी घाबऱ्या घाबऱ्या येते आणि ते दृश्य पाहून " ओह नो ! " करीत त्याच्या अंगावर पडते. ती रडते आहे, दरवाजा बाहेरून खडखडवला जात आहे.... पण पडदा. ]

# डिअर पिनाक

( एक टेबल. टेबलाच्या मागे दोन व डाव्या—उजव्या बाजूला चार चार खुर्च्या. टेबलामागचे प्रिं. शारंगपाणी बोलायला उभे राहिले आहेत; टेबलावरच्या चादरीचे धागे काढत गूढ आणि गंभीर वातावरण तयार करीत आहेत. उजवी खुर्ची क्र. १ : प्रा. बर्वे–कुठंतरी तंद्रीत खुदकन् हंसलेत् पण प्रिन्सीपॉलकडे पाहून भानावर. खुर्ची क्र. २ : प्रा. जगताप : अतिशय निर्विकारपणे प्रेक्षक-वृंदावरून फिरती नजर. खुर्ची क्र. ३ : प्रा. सौ. बुजुर्ग : हाताची नखं निरखताहेत आलटून पालटून. सारख्या खुर्चीत सावरून बसताहेत. खुर्ची क्र. ४ : कु. चिंचणकर : हळूंच हातातल्या चिटोऱ्यात आणि वर आकाशात अशी दृष्टीची चलबिचल. तोंडानं पाठांतरासारखं पुटपुटणं. टेबलामागची खुर्ची क्र. २ : व्हाईस प्रिन्सीपॉल लुकतुके, प्रिन्सीपॉलच्या मागून डावी खुर्ची क्र. १ वरच्या प्रा. कानविंद्यांशी खुणेनं निरोपानिरोपी. प्रा. कानविंदे मान डोलावून प्यूनला बोलावतात. त्याला खुणा. प्यून दहा वेळा मान डोलावतो. प्रिन्सीपॉल वळून पाहतात. तेव्हा कानविंदे हातानंच—" तुम्ही सुरू करा " अशी खुण करतात. खुर्ची क्र. २ : श्री. रानडे, प्रिन्सिपॉलचं लक्ष वेधून आपल्या अस्तित्वाची जाण देताहेत. खुर्ची क्र. ३ : मराठे : हा विस्फारल्या डोळ्यांनी कुठंतरीच पाहतो आहे. भानावर नाही. खुर्ची क्र. ४ : रिकामी. )

शारंगपाणी.... विद्यार्थी मित्र हो, आज आपण इथे एक प्रकारच्या जड आणि भारावलेल्या अशा एकंदर मनःस्थितीत जमलो आहोत. खरं म्हणजे काय बोलावं, कुठून सुरुवात करावी हेच मला समजत नाहीये. एका इंग्लीश कवीनं म्हटल्याप्रमाणे :—

And when I set apart my lips
I fear, my heavy heart out leaps !

एका, खरोखर कठीण अशा परिस्थितीत आपणा सर्वांना टाकून

पिनाक घोष आज आपल्यातून निघून गेला आहे ! मी, नव्हे सारं कॉलेज – ज्याच्याकडे मोठ्या आशेनं पहात होतं – की हा उद्या ह्या कॉलेजची मान उंच करेल ! स्वतः तर कर्तृत्वाची भरारी मारेलंच परंतु त्याचबरोबर आपणा सर्वांची शान वाढवेल ! – पण दैवाला हे मान्य नव्हतं ! पिनाक घोष – हा एक बुद्धिवान् विद्यार्थी तर होताच, पण त्याचबरोबर एक उत्तम वक्ता, एक उत्तम खेळाडू, उत्तम कवी – उत्तम लेखक, ज्याला एक All-round personality म्हणता येईल – अशी ती होती ! काल–परवापर्यन्त ज्याला आपण आपल्यात पहात होतो, त्याच्या मृत्युची शोक-सभा आज आपल्याला घ्यावी लागली आहे – हे आपलं – आणि पर्यायानं साऱ्या समाजाचं खरोखर एक मोठं दुर्दैव आहे. अगदी आकस्मित असं त्याचं निधन झालेलं आहे. म्हणजे आपले उप-प्राचार्य लुकतुके आज जेव्हा मला सकाळी म्हणाले तेहां – I was actually… shocked ! I could not believe; पण…. होणारं अटळ असतं ! विधीलिखीत कुणाला टाळता येत नाही ! आपण फक्त एवढंच करू शकतो – देवाला प्रार्थना ! ईश्वर मृतात्म्यास शांती देवो !

( चुकून दोन टाळ्या पडतात. )

प्रा. बर्वे …. ( किती बोलू आणि किती नको अशा उत्साहानं उठतात. पण – एक छानसा दीर्घ Pause देऊन– ) मी आपला फार वेळ घेणार नाहीये. आज जेव्हा ही बातमी मला समजली, तेव्हा मला धक्काच बसला. क्षणभर मी सुन्न झालो. मला काही सुचेनासंच झालं. सहज आठवायला लागलो, की माझी पिनाकशी ओळख केव्हा झाली. तीन–चार वर्षांपूर्वीची ती घटना मला अगदी काल–परवा घडल्या-सारखी आठवली. मी वर्गात कधी कुणाला बोलू देत नाही. म्हणजे शंकासुद्धां नंतर कॉमन–रूममध्ये विचारायच्या असा मी पहिल्या-

पासूनच नियम घालून दिलेला आहे. माझी आपली ती एक व्यक्तिगत शिस्त .... तर पी. डी. च्या वर्गात एक विद्यार्थी बोलतोय् . मी सरळ त्याला उभं केलं. आणि वर्गाबाहेर काढलं. तास संपल्यावर तो माझ्यापाशी आला. तो पर्यंत मी विसरुनही गेलो होतो. अशा गोष्टी मी कधीच लक्षात ठेवत नाही. मग त्यानी मला सगळं सांगितलं; माझी क्षमा वगैरे मागितली ... तो पिनाक घोष ! तर तेव्हापासून मी त्याला आज चार वर्षे ओळखतो आहे. त्यालाही माझ्याविषयी फार आदर वाटायचा. मी त्याला नेहमी म्हणायचो– (प्रिन्सिपॉल शारंगपाणी प्रा. बर्वेंना जवळ बोलावतात. कानांत काही तरी कुजबुजतात.) – तर मी कधीही विसरु शकणार नाही. आज पिनाक आपल्यातून गेला, पण आपण त्याच्या गुणांपासून, शिक्षकांविषयीच्या आदरबुद्धिपासून जर काही घेतलं आणि ते आचरणात आणण्याचा प्रयत्न केला तर ती एक मोठी चांगली अशी श्रद्धांजली ठरेल ! मी व्यक्तिशः पिनाकच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे ! ईश्वर –

(मराठे त्वेषाने पुढं येतो– )

मराठे .... Thanks a lot sir, ! But for your information, Sir .. पिनाकला आई–वडिल नाहीत. कुणी नातेवाईक नाहीत. आहोत फक्त आम्ही काही मित्र. आम्हांला आज तो पोरका करून .... गेला .... (त्याला बोलवत नाही. तो तिरीमिरीत आत निघतो. प्रि. शारंगपाणी प्यूनला खुणावतात. पण मराठे प्यूनचा हात झिडकारून आत निघून जातो. काही वेळ शांतता. प्रा. बर्वे वेडपटासारखे मराठे गेला तिकडे बघताहेत ते प्रा. सौ. बुजुर्ग बोलायला उठल्यावर भानावर येऊन आपल्या खुर्चीत बसले आहेत.)

सौ. बुजुर्ग.... (हात मागे बांधून–) आज आपण पिनाक घोष ह्या तृतीय वर्ष–कला – मध्ये शिकणाऱ्या – सर्वांच्या आवडत्या – अशा विद्या–

र्थ्याच्या दुःखद निधनाबद्दल — जमलो आहोत. मी आपल्या कॉलेजच्या प्राध्यापक वर्गातर्फे त्याला आदरांजलि वहाते आहे. ईश्वर त्याच्या आत्म्यास शांती देवो, ही प्रभुचरणी आमची विनम्र प्रार्थना आहे ! ( बसतात )

जगताप .... पिनाक जायला नको होता. आपल्या कॉलेजची खेळांची स्थिती आधीच जरा वाईट आहे. पिनाक ह्या वर्षी इंडिव्हिजेबल चॅंपियनशिप डेफिनेटली मारत होता. पन् वाईट झालं ! तर सांगायचं म्हणजे, सगळ्या स्पोर्टस डिपार्टमेंटतर्फे आणि सगळ्या जिमखान्यातर्फे मी त्याला — ही — ही वाहतो. ( प्रेक्षकवृंदाला लवून नमस्कार करतात. )

श्री. रानडे.... ( अत्यंत एक्साईटमेंटमधे ) ऑफीस स्टाफच्या वतीनं मी आदरांजली वहायला उभा आहे, ईश्वर आत्म्यास चिरशांति देवो ! त्याचप्रमाणे आपले लायब्ररीअन काही कारणामुळे येऊ न शकल्यामुळे लायब्ररी स्टाफच्या वतीनं आणि चतुर .... चतुर .... चत्रु .... चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वतीनंही मीच आदरांजली वाहतो, ईश्वर चिरशांति देवो.

( घामाघूम होऊन बसतात ).

शारंगपाणी.... ( पुन्हा गंभीरपणे— ) आज शोकसभेत बोलण्याची आम्हाला दोन विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे परवानगी विचारली होती. त्यापैकी विद्यार्थीप्रतिनिधी मराठे काही कारणामुळे बोलू शकले नाहीत. आता विद्यार्थिनी प्रतिनिधी — कुमारी चिंचणकर बोलतील.

चिंचणकर.... माननीय प्रिन्सिपॉल शारंगपाणी, उप ... उप ... उप—प्रिन्सिपॉल लुकतुके, इतर प्राध्यापक वर्ग आणि उपस्थित विद्यार्थी—विद्यार्थीनीहो— आजच्या दुःखद प्रसंगावर मी एक कविता केली आहे, ती मी म्हणून दाखवणार आहे — कवितेचं नांव आहे — " **पिनाक आमचा गेला !** "

पिनाक अमुचा गेला, तो कुणी पाहिला का
काळाने निर्घृण असा परी, घाला घातला का ॥ धृ ॥
तारुण्याच्या उंबरठ्यावर, आला न एक जीव
तोच मृत्युशी न कळे का तो झाला एकजीव
बलिदान परी तुझे पिनाका, जाईल न कधी फुका —१—
पिनाक अमुचा गेला, तो कुणी पाहिला का ॥ धृ ॥
देते वचना, सकल जन तुझ्या गातील रे आरत्या
पुण्यतिथीला तुझ्या पेटवूं लक्ष लक्ष पणत्या
परि पणतीची ज्योत आज ही, विझून जाई का —२—
पिनाक अमुचा गेला, तो कुणी पाहिला का
काळाने निर्घृण असा परी, घाला घातला का ॥ धृ ॥

( मान लववून नमस्कार करतात. टाळीच्या आशेनं उभ्या राहतात. व्हा. प्रि. लुकतुके हलुच " छान ! छान " म्हणतात. तेव्हा जाग्यावर बसतात. चेहऱ्यावर आनंदाची बारीक छटा. )

लुकतुके .... पिनाक घोषचं जर एक वैशिष्ट्य सांगायचं झालं तर ते म्हणजे तो अतिशय मेहनती आणि कष्टाळु होता. तुम्हाला माहित नसेल, तर – आज – जी आपण आपली लायब्ररी रविवारीही उघडी ठेवतो – त्याच्या मागे पिनाकचाच बऱ्याच दिवसांचा आग्रह आहे ! म्हणजे रविवार म्हटला – की सुट्टी – मजा करा असा नव्हता त्याचा स्वभाव ! म्हणजे हे मोठं बघण्यासारखं आहे की – ज्ञानाची इतकी आस ! आज विद्यार्थ्यांच्यात दुर्मिळ आहे ! म्हणून – ( कॉलेजच्या घंटेचे दोन ठोके. घड्याळ पाहतात ) आज त्याच्या दु:खद निधनाबद्दल कॉलेजचे व्यवहार एक दिवस बंद ठेवण्याचा निर्णय प्रिं. साहेबांनी घेतला आहे. लायब्ररी देखील आजच्या दिवस बंद राहील. आतां त्याच्या दु:खद निधनाबद्दल आपण उभे राहून दोन मिनिटे स्तब्धता पाळणार आहोत.

( सारेजण उठून उभे राहतात. माना फाशी गेल्यासारख्या खाली. )
पडद्यामागे संवाद ....

१ मुलगी .... ए, शमा ss ! अग आज सुट्टी !
२ मुलगी .... चल, ए ! खरंच ?
१ मुलगी .... अग, शप्पत ! टी. वाय्. चा कुणी तरी मुलगा गेला म्हणे !
३ मुलगी .... हो ! पिनाक घोष म्हणून ! स्कॉलर होता म्हणे खूप !
४ मुलगी .... स्कॉलर ? इ ss ! एक नंबरचा लोफर होता ! मला विचार !
२ मुलगी .... ए गेलेल्याविषयी असं बोलू नये ग ....
४ मुलगी .... ना s s ग, तरी ! आमची शमुली .... ती s s ! ( हंशा )

१ प्रौढ .... ओह s s ! How sad !
२ प्रौढ .... He was very promising, no ?
१ प्रौढ .... नक्कीच ! नो s s s नो, नो ! आज शिकवायला अगदी मूड नाही लागणार.
२ प्रौढ .... अहो ! आज सुट्टीच आहे ! ( हंसतात. )

१ मुलगा .... अरे, यार ! कंडा साला ! मारो गोली पिरीयडको !
२ मुलगा .... गेलं – पोरगं कामातनं गेलं ! ए ss शुद्धीवर ये, येड्या ss
१ मुलगा .... ए – भंकस नको ! मॅटिनीला बोल काय काय आहे ?
२ मुलगा .... का ? परवाच्यासारखा बापाच्या हातचा मार खायचाय् !
१ मुलगा .... तू तर – यक्कण साला ! अरे, आज हॉ – ली – डे; नोटीस बघ !
२ मुलगा .... आयला, हो ? ( झकास शिटी घालतो ).

( रेडिओची वेगवेगळी स्टेशन्स लावत असल्याचा आवाज– )
बाई .... पण, खरंच का हो, एवढा चांगला होता बिचारा ?
पुरुष .... अग, हो ग ! काय कटकट आहे तरी !

चाई .... काय वाटलं असेल बिचाऱ्याच्या आई–वडिलांना !

पुरुष .... कमाल आहे हं ! एक दिवस म्हटलं जरा unexpected सुट्टी मिळाल्येय, घरी जाऊन चांगली रेस्ट घ्यावी ! तर तुझं ! कोण कुठला पिनाक आणि घोष – ( जांभई देतात ).

" ईश्वर मृतात्म्यास सद्‌गति देवो ! " असे सुटे सुटे आवाज हळूंहळूं एकमेकात मिसळून गडबड. हा आवाज एकदम थांबतो आणि स्टेजवरचे लोक खाली बसतात ).

( हळूहळू त्यांच्यावरचा प्रकाश कमी कमी होत पूर्णपणे fade up ! कोपऱ्यात एक व्यक्ति उभी. तिच्या पावलांवर स्पॉट. चेहरा अंधारात. )

आवाज .... मी पिनाक घोष. एक विद्यार्थी. तुमच्या सारखा. किंवा तुमच्या मित्रासारखा. किंवा तुमच्या शेजारी दिनूकाका आहेत ना, त्यांच्या मुलासारखा. किंवा तुमच्या मुंबईच्या मावशी आहेत ना, त्यांच्या मुलासारखा. अगदी साधा आणि सामान्य. म्हणजे सगळ्यांना मी कळतोय कोण आहे ते, पण ओळखत नाहीये. कारण, कुणाला न कळण्याइतका मी ग्रेट नाही. तसंच सगळ्यांनीच ओळखावं इतका इतरांपेक्षां वेगळाही नाही. मग तुम्ही सगळे एकीकडे नी मी हा असा तुमच्या समोर कां ? कालपर्यन्त मी तुमच्यातच होतो. आज तुमच्या वर्तुळातून बाहेर पडलोय्, एवढंच ! आणि तेवढं सोडलं, तर काल तसं काही विशेष घडलं नाही ! आपण आज आहोत म्हणून त्याला काल म्हणायचं इतकंच ! एरवी नेहमीसारखाच तो एक दिवस ! .... मी पहाटे उठलो ! हुशार मुलं पहाटे उठतात म्हणून ! चार जाड पुस्तकातून काट छाट करीत – एक घमेलंभर शब्द वहीत ओतून काढले ! छोट्या छोट्या टिंबांनी त्यांची वाक्यं, परिच्छेद असे सर्वसामान्य गटही तोडले ! तीन तास पुरलं हे काम मग शरीराचे सोयस्कार केले ! छान नटून कॉलेजात गेलो ! चार

विद्वानांनी धरून आणलेले घमेलंभर शब्द बदबदा कानांवर ओतून घेतले ! त्याच वेळी वर्गातल्या त्याच त्याच मुली तितक्याच वेळा पाहून घेतल्या ! पण तिरक्या नजरेनं ! सभ्य मुलं सरळ पाप करीत नाहीत ! मग बाहेर आलो ! जुन्या मित्रांना जुन्या मुलींवरून चिड-वलं, नव्यांना नव्या मुलींवरून ! मला चिडवलं, तेव्हा लाजलो. ती मुलगी तेव्हढ्यांत तिथून गेली म्हणून सगळ्या दोस्तांना खाऊ घातलं ! खाऊ घातल्यानंतर दोस्त वाढले, दोस्ती वाढली ! मोठी मजा आली ! .... ऊन चढलं ! सकाळच्या पोरी गेल्या, दुपारच्या यायच्या होत्या – म्हणून जाऊन निरस अन्नाचा कडबा पोटात ढकलून आलो ! हॉस्टेलमधून बाहेर पडलं की कॉलेज ! भरल्या पोटी – दोन पी. डी. च्या पोरांना अभ्यासाचा गायडन्स दिला, डिबेटिंग कॉम्पीटिशनला नाव दिलं, फिलॉसॉफीच्या सरांकडून एक भलं मोठं पुस्तक घेतलं आणि लायब्ररीवर नेहमीच्या जागी येऊन बसलो ! झोप जाईस्तोपर्यन्त त्या पुस्तकातले थोडेसे शब्द वेचून काढले ! पुरेशा लोकांनी मला अभ्यास करताना पाहिल्यावर उठून खोलीवर आलो ! पार्टनर झोपून उठला होता ! तो म्हणाला " पिक्चरला जाऊं " ! मी म्हटलं, " कडकी " ! तो म्हणाला, " मी दाखवतो " ! गेलो ! कुणाची तरी फजिती पडद्यावर पाहून– आपण तो नाही – ह्या समाधानात खूप हसलो ! दोन ओळी पुढच्या उजवीकडल्या सीटवरची पोरगी बरी होती ! पहात होती ! पिक्चर सुटल्यावर डायरेक्ट ' गुडलक 'ला गेलो ! गरम चहा मारून गॅंगमध्ये येऊन बसलो ! रोजच्या दिसणाऱ्या पोरी जरा आधी, मग अशा दिसून गेल्या, पाहणाऱ्या पाहून गेल्या. गॅंगमधल्या धीट पोरांनी कॉमेंटस् मारल्या ! सज्जन पोरासारख्या मी त्या ऐकल्या ना ऐक-ल्याशा केल्या ! अंधार पडला ! गॅंग पांगली ! मराठे उरला ! राजकारण, अभ्यास, ध्येय, अध्यात्म, राष्ट्रासाठी त्याग, अन्यायाची

C9826 ३८८9 ६५

चीड, खोटेपणाचा राग, नवीन कविता, नव्या एकांकिकांचे मनसुबे ! मराठ्याशी भडभडा बोललो. माझ्याकडे आदरानं पाहून त्यानं माझा निरोप घेतला ! एकट्याला भयंकर कंटाळा आला ! अधांतरी लोंब-कळल्यासारखं रिकामं रिकामं वाटलं ! ... शुभांगीची आठवण झाली ! कॉलेजवर नाटकाची प्रॅक्टिस चालू होती ! मीच लिहिलेलं नाटक ! माझ्या स्वप्नभंगावरचा सूड म्हणून ! प्रॅक्टिसच्यावेळची परकी शुभांगी, रात्री घरी पोहोचवताना जवळकीनं वागली ! मी खूप लहान मुलासारखा बोललो, ती छान हंसत होती. तिच्या घराशी मला तिला घट्ट मिठी मारायची भोवंडून टाकणारी उर्मि आली ! नेहमीसारखी ! घराच्या उंच पायरीवरून तिनं मला जागं केलं "अच्छा ! थँक्स् हं !" मी नेहमीसारखा परत फिरलो ! घरांच्या ओबडधोबड थडग्यां-तून – रस्त्याच्या काळाशार स्मशानवाटेच्या आधारानं – थिजलेल्या पिवळ्या प्रकाशडबक्यांच्या सोबतीनं ! एकदा वाटलं, माझ्या पुढे मागे निशब्द, मूक अशी अदृश्य माणसं चालली आहेत, माझी अंत्ययात्रा घेऊन. मी थांबलो ! माझ्या आजुबाजूला सगळं काही थांबलेलंच तर होतं ! मी असण्यानं काही बनत नव्हतं – नसण्यानं काही बिघडणार नव्हतं ! एक गुरखा भेटला ! ओळख दिली ! माझ्यातला मी एकदाच हिंदकळला ! जाणवला ! गुरख्याच्या खांद्याचा आधार घ्यावासा वाटला ! पण शक्य झालं नाही !

(स्पॉट जातो. स्टेजवर हळूहळू पूर्ववत् प्रकाश. प्रा. बर्वे खुर्चीत मोकळेपणी बसले आहेत. जगताप आणि रानडे टाळीवर टाळी देताहेत. लुकतुके – बुजुर्ग आणि चिंचणकरशी हळुवारपणे बोलता-हेत शारंगपाणी खुर्चीत बसल्याबसल्या ते पाहताहेत. शारंगपाणी उठून प्रा. बर्वेपाशी जातात. प्रा. बर्वे मुद्दाम कुठंतरी शून्यात पाहताहेत.)

शारंगपाणी.... सर आज प्रॅक्टीस घ्यायची की –

चिंचणकर .... हो ना सर ! आज मूडच नाही सर !

प्रा. बर्वे .... ( भानावर आल्यासारखं करीत, एकदा डोळे मिटून ) मला तर आज दिवसभर काही सुचलं नाही. आतासुद्धां संवयीप्रमाणे पाय कॉलेजकडे वळले, म्हणून आलो.

लुकतुके .... पण सर – ! आज प्रॅक्टिस व्हायलाच पाहिजे सर ! आठवडयावर आली कॉम्पिटीशन ! माझं तर अजुन पुरतं पाठ नाही सर !

प्रा. बर्वे .... तेही खरंच आहे ! आपलं माणूस गेलं की वाईट हे वाटणारच, पण व्यवहार नाही विसरता येत !

लुकतुके .... ( उत्साहानं ) Come on, Come on मंडळी !

( बर्वेही उठतात. सेट लावला जातो – म्हणजे मधली बाकडी बाजूला करून जागा मोकळी केली जाते. )

प्रा. बर्वे .... सुबेंदुच्या एन्ट्रीपासून घ्या !

चिंचणकर.... पण, सर s s s ! पियू कुठं आल्येय !

कु. वुजुर्ग .... अय्या हो ! आज अगदी कॉलेजातसुद्धां दिसली नाही कुठं !

प्रा. बर्वे .... ती जरा नर्व्हसच असणार ! काल तिला पोहोचवून येता येताच....

शारंगपाणी ... हार्टफेल का हो ?

चिंचणकर.... शी : ! सर, प्लीज तुम्ही कुणाच्या मरण्या-बिरण्याचं नका ना काढू ! मला रात्रीची फार भिती वाटते !

लुकतुके .... हो, सर ! आणि मूडही जातो सगळा !

प्रा. बर्वे .... ओ, के ! ओ, के ! करा सुरुवात ! – आणि शुभांगी येईपर्यन्त पियूचं तुम्ही वाचा चिंचणकर !

लुकतुके .... वा : ! That will be nice, sir !

चिंचणकर .... ( उत्साहाने ) ए ! जरा पान सांग ना ! – ह ! रेडी ?

लुकतुके .... ( नाटकी ) – पियू – पियू तू आज अशी उदास का ?

चिंचणकर .... ( हंसते )

लुकतुके .... ए ! असं काय ग ?

चिंचणकर .... ( हंसत – ) नाही सर, ह्या कॉपीत उदासच्या ऐवजी उदार लिहीलंय् !

( प्रा. बर्वे मोठ्यानं हसतात. लुकतुके, चिंचणकरसुद्धां आवाज मिसळतात. शारंगपाणी आणि बुजुर्ग कुजबुजत बोलत असतात, ती बाजूला होतात ! रानडे आणि जगताप बव्याच्या मागे येऊन बसतात. )

प्रा. बर्वे .... हां – हां ! Continue !

लुकतुके .... ( नाटकी–) ए – बोल ना पियू ! Anything wrong ? हां ! काल वर्गात तुझ्याशी बोललो नाही, म्हणून ना ! ए s s, वेडी ! एवढं काय ग तू बारीकसारीक मनाला लावून घेतेस ?

चिंचणकर.... ( भलत्याच निरस टोनमध्ये – ) बारीकसारीक ! आम्ही एवढे दाराशी थांबलेलो –

प्रा. बर्वे .... अरेरे ! अहो काय हे चिंचणकर !

चिंचणकर .... पण सर, मी शुभांगीच वाचतेय !

प्रा. बर्वे .... अहो, पण जरा चांगलं वाचलं तर काही बिघडेल का ? ॲटमॉस्फीअर क्रिएटच होत नाही ! ( सिगरेट शिलगावतात. जगताप, रानडेही सिगरेट पेटवतात; शारंगपाणी आणि बुजुर्गचं गुफ्तगूं एका बाजूला चालूच आहे. लुकतुके हळूच येऊन जगतापांच्या सिगरेटीचा एक झुरका मारून मैदानात दाखल झाले आहेत ) हां ! Continue !

( खुर्चीत पसरून बसतात )

लुकतुके .... ( नाटकी – ) अग हो – पियू खरं आहे ! पण मला फार – फार घाईनं जायचं होतं ग ! ताबडतोब बोलावलं होतं –

चिंचणकर .... सर इथं नुसतंच ' सु ' लिहिलंय, सुबेन्दु पाहिजे ना ?

प्रा. बर्वे .... तुम्ही कमाल करता बुवा चिंचणकर ! अहो, जसं आहे तसं वाचा ! सु – लाडानं, प्रेमानं हाक मारत्येय ती !

चिंचणकर.... हां – हां ! ( नाटकी ) – सु s s ! तू – तू पुन्हा त्यांच्यात जायला लागलास सु – प्लीज ! माझी शप्पत आहे तुला !

लुकतुके .... पियू – मला गेलं पाहिजे ! माझ्या शरीरातला रक्ताचा बिंदु नि बिंदु उसळतोय् ! मला स्वस्थ नाही बसू देणार तो ! विचारांची सद्दी संपते तिथे action च पाहिजे पियू ! कोण सुबेंदु ? एक सुबेंदु गेला – असे शंभर सुबेंदु गेले तरी बेहेत्तर ! पण हा लढा लढलाच पाहिजे ! हे माजलेले भांडवलदार.... सर ' तिथे, दोघं अस्वस्थपणे, निःशब्द बसून राहतात ' म्हणजे आम्ही काय करायचं ?

प्रा. बर्वे .... आं ? हो ! Actions नंतर बसवू हो आपण ! आता तुम्ही वाचा तर नुसते ! हां ! Continue.

रानडे .... सर, सर – कुणी तरी आलंय्....

( डोक्याला आणि तोंडाचाही बराचसा भाग झाकेल असा मफलर गुंडाळलेली व्यक्ति आत येते. )

व्यक्ति .... सर, शुभांगी आज येणार नाही, तिचा निरोप घेऊन आलोय !

प्रा. बर्वे .... हो, हो ! But natural ! आम्हीसुद्धां खरं मूडमध्ये नाहीच पण–पण असं आहे – ( Pause ) तुम्ही कोण – शुभांगीचे बंधू वाटतं ? काय करता ?

व्यक्ति .... निरोप कळला ना ?

प्रा. बर्वे .... ( त्या व्यक्तिच्या एकटक बघण्यानं चमकून ) हो, हो ! It's all right ! हरकत नाही ! मी समजू शकतो.

व्यक्ति .... मी जरा वेळ इथं बसलो, तर चालेल का ?

प्रा. बर्वे .... ( हंसून ) अं – हो, हो ! Why not, why not ! जरूर ! पण जरा तिथं बाजूला बसावं लागेल हं, म्हणजे काय आहे, की हे – हे आमचं स्टेज आहे ! हॅ s s हॅ s s हॅ !

( जराशा अंधाऱ्या बाजूलाच ती व्यक्ति बसते. )

प्रा. बर्वे .... हां ! Continue !

चिंचणकर .... (घाईघाईत) सुबेंदु – शंभर सुबेंदु – लढा – माजलेले – हां ! सापडलं ! ए – सुंऱ्या, ready ? ( नाटकी ) मिस्टर सुबेंद्रनाथ चटर्जी, माझं एक काम कराल का ?

लुकतुके .... बोला, श्रीमती पियूराणी घोष !

चिंचणकर .... माझ्याजवळ एक फोटो आहे ! सुंदर डोळ्यांच्या, राजबिंड्या राजपुत्राचा ! त्याच्या सुंदर डोळ्यांत इतकी छान छान स्वप्नं असायची ! सारखी वेचाविशी वाटत ! माझ्या जवळ असला की त्याला दुसरं काही सुचतच नसे ! सारख्या कविता करायचा – माझ्यावर ! मी त्याच्या खांद्यावर डोकं ठेवून, डोळे मिटून नुसत्या ऐकत राहायची ! पण हा माझा राजपुत्र हरवलाय् हो ! द्याल शोधून ?

प्रा. बर्वे .... अहो लुकतुके, actions मग बसवतो म्हणून सांगितलं ना ! हातात हात कशाला घेतला आहात चिंचणकरांचा !

लुकतुके .... ( नाराजीनं हात सोडून – ) पियू – मला समजतंय् ! पण – पण तुलाही असंच वाटतं ? मी गाढवासारखी अभ्यासाची ओझी वाहून दाखवावीत – मग ते बघून युनिव्हर्सिटीनं खूष होऊन मला पदव्यांच्या शेपट्या चिकटवाव्यात ! मग – मग लाचारीनं मी ढेरपोट्या साहेबांच्या हाताखाली गुराढोरासारखं राबावं ! आणि असले तोंडावर फेकलेले पैशाचे कपटे झेलीत जगावं !

चिंचणकर .... अस मी कधी म्हटलंय – सु ! पण तुझ्यात स्वतंत्र प्रतिभा आहे. तू कलावंत म्हणून जग ! स्वाभिमानानं जग ! पण चारचौघांसारखं सुखी आणि समाधानी आयुष्य नाकारू नको !

लुकतुके .... म्हणजे काय ? लग्न करू ? पोरांचं लेंढार उरावर घेऊ ? – आणि या अन्यायानं, जुलमानं बरबटलेल्या समाजांत जगू ? नुसता ? निर्लज्जपणे ?

आवाज .... ( फक्त बर्व्यांनाच ऐकू येतो ) प्राध्यापक बर्व्यांसारखा !

प्रा. बर्वे .... ( खुर्चीत एकदम हादरतातच ) What ? काय म्हणालात लुकतुके ?

लुकतुके .... आं ? हेच ! – बरबटलेल्या समाजात जगू – निर्लज्जपणें !

प्रा. बर्वे .... एवढंच ?

लुकतुके .... ( आश्चर्यानं ) हो ! का सर ?

प्रा. बर्वे .... ( गडबडीनं – ) नाही. म्हणजे मला काय म्हणायचंय् – अजून टोनिंग बरोबर येत नाहीये हो ! – बघा ! आता तो हे कसं म्हणेल ! चिडून म्हणेल की नाही ? तुम्ही कसं मिळमिळीत म्हणालात ? जीव तोडून बोललं पाहिजे हे ! क्षणभर कल्पना करा की, तुम्हीच सुबेंदु आहात आणि मग म्हणा ! भूमिकेशी कसं एकरूप पावलं पाहिजे, म्हणजे ती अभिव्यक्ति –

आवाज .... ( फक्त बर्वेंच ऐकतात ) फारच बुवा विनोदी तुम्ही, प्रा. बर्वे !

प्रा. बर्वे .... ( एकदम वळून – ) रानडे ! तुम्हांला कितीदा सांगितलं ! प्रॅक्टिस चालली असेल, तेव्हा disturb करत जाऊ नका ! ( रानडे आणि जगताप बोलत असतात, ते एकदम थांबतात. ) हॅ ऽ ऽ ! ( डोळे मिटून खुर्चीत बसतात. )

रानडे .... सर – चहा सांगायचा का ?

शारंगपाणी.... हो – सर ! थंडीचा चहा हवा बुवा गरमा गरम !

प्रा. बर्वे .... जा ! रानडे आणि जगताप ! चहा सांगून या – किती ?
एक, दोन –
( व्यक्तिस – ) का हो तुम्ही काय घेणार ?

आवाज .... ( फक्त बर्व्यांना – ) जीव !

प्रा. बर्वे .... ( किंचाळतात ) माझा ?

जगताप .... सर, तुम्हांला काही होतंय् का ?

प्रा. बर्वे .... आं ? कुठं ! त्यांना विचारतोय चहा घेणार का ?

जगताप .... नको म्हणाले ते !

प्रा. बर्वे .... हो ना ? मग – सात चहा सांगून या ! छे डोकं दुखतंय जाम !

बुजुर्ग .... सर, पिनाकचं तुम्ही फार लावून घेतलंय मनाला !

शारंगपाणी.... सर, सर ! आता आपल्या एंट्रीत लेखकाच्या जागी कै. लिहायला हवं हं, पिनाक घोषच्या मागे !

लुकतुके .... हो ! आणि जगतापबुवा ! Cast मध्यें नका लिहू कै. पिनाक घोष ! नाहीतर आपल्या प्रयोगाऱ्यावेळी परीक्षकांसकट सगळे व्हायचे गुल !

( सगळे हंसतात. मग प्रा. बर्वेही हंसतात. )

प्रा. बर्वे .... ( हंसणं थांबवीत – ) हं – चला ! Continue !

चिंचणकर .... सर, हे फार बोअर आहे सर ! दुसरं घ्या ना काहीतरी !

लुकतुके .... हो सर ! आणि हा पीसही बसलाय चांगला !

प्रा. बर्वे .... ठीक आहे ! मग – हं – हं – चहा येईपर्यन्त तुमचा तो – तो सीन होऊन जाऊं दे – " सौंदर्य – सौंदर्य – " !

लुकतुके .... ( शोधतात, चिंचणकरला दाखवतात; पण नाटकी – ) सौंदर्य – सौंदर्य ! पियू , तू निसर्गाचं सौंदर्य पाहिलं आहेस कधी ! इतकं निर्मळ, निष्पाप ! आम्हीं मित्र ट्रिपला गेलो होतो एकदा ! कुठं नेमकं ते नाही लक्षात ! पण – पावसाळ्याचे दिवस होते ! आम्ही एका पुलावरून डोंगराच्या कडेला वळसा घालून पुढे गेलो ! – आणि . . क्षणभर अवाक्‌च झालो ! कोणत्या तरी अद्‌भुतरम्य जगात आल्यासारखं वाटलं ! दूर क्षितीजापर्यन्त हिरवंगार रान ! त्यातच डोंगरांच्या उतरणी ! उतरणीवर लोंबलेले काळे काळे ढग ! मातीतून येणारा सुगंध ! वाटलं – झोकून द्यावं स्वतःला; तुफान वेगानं पळत जावं नि त्या डोंगरांना कवेत घ्यावं ! ढगांनाच तोंड लावून ते घटाघटा प्यावेत; मातीचा सुगंध पिऊन घ्यावा, त्यात न्हाऊन जावं ! विरघळून जावं, त्या वातावरणांत विरघळून जावं ! पियू , त्या वेळी तू जरी शेजारी असतीस ना, तरी तुझ्याकडं पाहिलं नसतं मी ( थांबून – ) रागावलीस ?

चिंचणकर .... नाही रे ! तू बोलत रहा ! तू असा बोलायला लागलास की

वाटतं असंच जीवाचा कान करून जन्मभर ऐकत रहावं – किंवा असं ऐकता ऐकताच जीवन संपून जावं.

लुकतुके .... अहा रे खुळाबाई ! मी बावळटासारखं बडबडतो काही नाही ते–

चिंचणकर .... जीवनाचं तत्वज्ञान सांगतोस तू सु मला ! तुला कदाचित्, तू कोण आहेस, हे नसेल जाणवत ! पण मी सांगते, तू फार ग्रेट आहेस ! सु, ग्रेट आहेस !

लुकतुके .... त्याचा काही उपयोग नाही, पियू ! काही उपयोग नाही ! समुद्र-किनाऱ्याची कड धरून चांदण्या रात्री हात पसरून मी वाळूतून वेड्यासारखा धावत सुटतो – तेव्हा मला मी फार मोठा वाटतो ! मुर्दाडपणे समुद्रात घुसलेल्या त्या डोंगरकड्याला बेधडक धडकावं, इतकी उमेद येते अंगात ! – आणि रेशनसाठी रांगेत उभा राहतो, Employment Exchange च्या ऑफिसबाहेर घामानं निथ-ळतो – तेव्हा मी फार क्षुद्र किडा होऊन जातो, कुणीही अंगठ्यानं चिरडावं इतका ! काव्य स्फुरतं, चित्रं काढतो, सतार वाजवतो नाहीतर उगाचच कशात तरी हरवून बसतो – तेव्हा सगळं विश्व इंद्रधनुष्यी रंगांचं दिसतं ! बेहोष करणारं ! – आणि लोकल-मध्ये उभा असतो, इंटरव्ह्यूसाठी उभा असतो, चाळीच्या गॅलरीत उभा असतो, तेव्हा वाटतं ही माणसांची दुनिया पांढरा ध्वज घेऊन उभी आहे ! शरणागत होऊन !

बुजुर्ग .... वंडरफुल ! सर, पिनाकनं काय ग्रॅन्ड लिहिलंय, सर ! लेखकाचं प्राईझ शुअर मारणार तो !

शारंगपाणी.... आता काय उपयोग पण बुजुर्ग !

चिंचणकर .... ए ! पण तुम्हांला नाही वाटत ? सुबेंदुच पात्र पिनाकनी स्वतःवरनंच लिहिलंय म्हणून !

आवाज .... ( फक्त चिंचणकरलाच – ) निर्मिती म्हणजे माणसाच्या 'मी' चाच आविष्कार असतो. कलाकारातला जितका खोलवरचा मी उसळून

येईल, तितकी कलाकृति अधिक सुंदर !

चिंचणकर .... काय सर ? मला कळलं नाही !

आवाज .... ( फक्त चिंचणकरांना – ) नाही कळलं ? भावना हीसुद्धा एक निर्मितीच ! लुकलुके बुजुर्गाकडे पाहतात तेव्हा तुम्ही अस्वस्थ का होता चिंचणकर !

चिंचणकर .... सर s s s ( तोंड ओंजळीत लपवतात. )

प्रा. बर्वे .... मी कुठं काय म्हणालो ! ( कुणालाच काही कळत नाही, इतक्यात– चहा येतो. त्याबरोबर सर्व relax होतात. )

प्रा. बर्वे .... ( चहाचा घोट घेऊन ) – मी सांगू चिंचणकर ! म्हणजे तुमच्या नसणारच लक्षात आलं, पण – पिनाकला जमलं नाहीये हे नाटक ! म्हणजे.... म्हणजे बुजुर्ग मी त्याचं साहित्यीक मूल्यमापन करून सांगतोय हं, हे ! म्हणजे काय असतं – (चहाचा घोट- ) नाटकाचे काही संकेत असतात.–

आवाज .... ( बर्व्यांनाच फक्त – ) जीवनाचेही संकेत असतात.

प्रा. बर्वे .... ( दुर्लक्ष करीत– ) कितीही झालं तरी शेवटी नाट्य म्हणजे काय की जे वस्तुतः नाही त्याचा आभास ! म्हणजे, नसलेलं भासवायचं ते नाट्य, की नाही !

आवाज .... ( बर्व्यांनाच फक्त – ) अभिनय छान करता !

प्रा. बर्वे .... ( पुन्हा दुर्लक्ष करीत – ) पण पिनाक फार सरळ लिहितो; आय मीन् – लिहायचा ( उगाचच हंसतात. ) आता, साधंच पहा ! त्याचा सुबेंदु एंट्रीपासून असं काय बडबडायला लागतो की लोकांना वाटतं – तरीही हा जगतोय का ?

आवाज .... ( बर्व्यांनाच फक्त ) खरंच, तरीही बर्वे जगताहेत का ?

प्रा. बर्वे .... ( उसळून ) यू शट अप्, मिस्टर शारंगपाणी ! मी एवढं सिरीय-स्ली सांगतोय, तुम्हांला विनोद सुचताहेत ! मी दोनतीनदां दुर्लक्ष केलं ! मी स्वभावानं तसा फ्री आहे पण Don't misunderstand

me ( Pause ) काय बरं सांगत होतो, ओह् – लिंक तुटली ! बरं, ते जाऊ द्या ( चहाचा घोट – ) We shall continue.

लुकतुके .... सर, सर तो अगदी लास्ट पीस तुम्ही explain करणार होतात आज !

प्रा. बर्वे .... Which one ? हां; That's it ! Listen !
आणि शारंगपाणी –

शारंगपाणी.... अहो, पण मी काय –

लुकतुके .... ऐका हो ! हं, सर –

प्रा. बर्वे .... सिच्युएशन लक्षात घ्या ! नक्सलाइटस्चा हल्ला झाला आहे ! त्यात पियुचे वडील, आई, दोन नोकर आणि स्वतः पियू मारले गेले आहेत ! त्या वेळी सुवेंदु भूमिगत आहे ! पण कुठून तरी ही बातमी त्याला समजली आणि तो मागचं पुढचं न पाहता पियूच्या घरी आला आहे. कुणीतरी वाचलेल्यांपकी सांगितलंय की इथं पियू पडली होती ! मुंडकं – घडावेगळं केलेलं ! पुढचं त्याला ऐकवत नाहीये ! आपल्यालाच तंद्रीत तो बोलतोय – हं, वाचा आता लुकतुके !

लुकतुके .... ज्याचा गुणाकार शून्य, भागाकार शून्य, गोळाबेरीज शून्य – त्या गणिताची आकडेमोड किती ! कधीही सरळ न जाणारा एक बिंदू पळाला, खूप जोरात पळाला, सगळ्यांच्या पुढे गेला, पण त्यानं वर्तुळच पूर्ण केल ! वर्तुळ म्हणजे मोठं शून्य ! ! काही गुन्ह्यांना क्षमा नाही ! काही पापांना मुक्ति नाही ! काही प्रश्नांना उत्तरे नाहीत ! पश्चातापाला शिक्षा नाही – हीच किती क्रूर शिक्षा ! ! माणसं बुटकी होत चालली आहेत, वेडी होत चालली आहेत ! बुटक्या माणसांना दूरचं दिसत नाही ! वेड्यांना पाहिलेलं कळत नाही ! माणसं बुटकी बुटकी होणार आहेत – माणसं वेडीवेडी होणार आहेत – संपलं, सर !

प्रा. बर्वे .... हां आणि मग तो पकडायला आलेल्या पोलिस इन्स्पेक्टरजवळ पिस्तूल मागतो. इन्स्पेक्टर पिस्तूल देऊन शांतपणे बाहेर जातो, दार

लावून घेतो. आणि आत—ढिश्यॉ — ढिश्यॉ .... फिनीश —.द, एन्ड !
( चहावाल्याबरोबर बाहेर गेलेले रानडे, जगताप परत आलेत ! )

रानडे .... सर न्यूज ! न्यूज ! पिनाकची —

( सगळे एकदम गोळा होतात. )

जगताप .... नो — हार्टफेल — बिर्टफेल सर ! ( सगळे freeze )

[ पिनाकचा आवाज : " मी नेहमीसारखा परत फिरलो ! घरांच्या ओबड धोबड थडग्यांतून — रस्त्याच्या काळ्याशार स्मशानवाटेच्या आधारानं — थिजलेल्या पिवळ्या प्रकाशडबक्यांच्या सोबतीनं ! एकदा वाटलं माझ्या पुढे मागे निशब्द, मूक अशी माणसं चाललेत, माझी अन्त्ययात्रा घेऊन ! मी थांबलो ! माझ्या आजुबाजूला सगळं थांबलेलंच तर होतो ! मी असण्यानं काही बनत नव्हतं — नसण्यानं काही बिघडणार नव्हतं ! एक गुरखा भेटला ! ओळख दिली ! जंबिया बघायला मागितला आणि सरळ छातीत मारून घेतला— " ]

जगताप .... छातीत सुरा मारलान् सर ! ( एकदम movement )

प्रा. बर्वे .... माय गॉड !

चिंचणकर .... आई ऽऽ ग्ग !

बुजुर्ग .... बिचारा !

( स्टेजच्या एका टोकाला ती व्यक्ति आणि दुसऱ्या टोकाला हे कोंडाळं )

चिंचणकर .... तरीच शुभांगी नाही आली आज !

लुकतुके .... सर, यू रिमेम्बर ! पिनाक शुभांगीला नेहमी पियूच म्हणायचा !

प्रा. बर्वे .... येस् , येस ! मी त्याला विचारलंही एकदा—काय रे, हे पियू घोष नाव कसं काय ! गडबडला नि काय ?

बुजुर्ग .... सर, पिनाकचं आणि शुभांगीचं काही होतं !

लुकतुके .... आता घ्या ! अहो, जगजाहीर होतं की ते !

चिंचणकर .... आणि दर रात्री, शुभांगीला सोडायला आपला पिनाक !

लुकतुके .... मग काय, रान मोकळंच !

प्रा. बर्वे .... का हो ! मी ऐकलं होतं की फारच पुढं गेलं होतं म्हणे त्यांचं प्रकरण. मी ॲक्शनचं घेणार होतो. पण –

लुकतुके .... तुम्हांला माहीत नाही सर ! दोन महिने शुभांगीला हलवलं होतं.... अज्ञातस्थळी –

चिंचणकर .... शु: ए ! तो कोण तिचा ऐकत असेल ना ! हळू जरा !

( मग मंडळीचे नुसते हातवारे ! मोठया उत्साहाने ! हळूहळू हसताहेत ! आवाजही वाढतोय ! )

प्रा. बर्वे .... तरीच म्हटलं, एकदम हे वीर असे पळपुटेपणा का करून गेले ?

लुकतुके .... तोंड उरलं होतं कुठे दाखवायला !

चिंचणकर .... शी : ! असल्या माणसाचं नाटक आपण करायचं !

बुजुर्ग .... जाऊं द्या हो ! चिंचणकर, नाटकात काय वाईट आहे !

चिंचणकर.... का ? सर, सांगतातच आहेत की नाटक फालतू आहे म्हणून ! काय तर म्हणे सुवेंदुचं नुसतं – सु ! उद्यां काय लुकतुकेचं–लु, चिंचणकरचं–चिं ? शी: ! आणि तो शेवटचा परिच्छेद ! त्याचं त्याला कळलं होतं की नाही लिहिताना देव जाणे !

आवाज .... ( सर्वांना– ) ते कळायला तुला अजून पाच–सात जन्म मोठं व्हायला पाहिजे, बालिके !

( सगळेजण गडबडून एकमेकाकडे पाहताहेत. )

आवाज .... मी तुमच्यातच तर आहे, इतक्या वेळ ! पण असून दिसत नाही, तर दिसून काय कळणार !

( सगळे चमकून त्या व्यक्तिकडे पाहतात. विस्फारलेल्या नजरा. इतक्यांत दिवे जातात. )

चिंचणकर .... मेले ऽ ऽ ऽ !

लुकतुके .... अरे, सगळे एकत्र या रे ऽ ऽ !

बुजुर्ग .... सर ऽ ऽ, तेव्हढा दरवाजा लावा कुणी तरी! शारंगपाणी ऽ ऽ

प्रा. बर्वे .... अहो – चिंचणकर हात सोडा माझा ऽ ऽ

रानडे .... सखाराम ऽ ऽ !

जगताप .... पांडुरंग ऽ ऽ ऽ

( दिवे येतात. सातहीजण घाबरून कोपऱ्यांत उभे. त्यांच्यावर स्पॉट )

( शुभांगी येते. )

बर्वे .... शुभांगी ?

शुभांगी .... काय घाबरलेत पण सगळे! ( खळाळून हंसत ) मला वाटलंच होतं! मी मराठ्यांना म्हटलंसुद्धां! आज टेन्शनमध्यें - असणार एकेक! दिवे घालवून जरा गंमत करावी सगळ्यांची! ( थांबून ) अरेच्या! अजून सगळे गारठलेलेच! जाऊं द्या हो सर! ( बसते. ती सोडून इतरांना – )

आवाज .... खरंच, जाऊ द्या हो बर्वे! मंडळी relax! सगळी शेवटी गंमतच आहे! हे जग असंच अगदी झकास चालणार आहे! आपण इतरांसारखं बघून चालायचं, म्हणजे बस्! तुम्हांला म्हणून सांगून ठेवतो! असेच आपणही कधी तरी मरून जाउ – खोट्या खोट्या शोकसभा होतील – पुन्हां सगळे विसरून जातील – असले विचारही मनात आणू नका! जगत रहा! जगण्यालाच धक्का देतील असे विचार मनाला शिवूच देवू नका! आणि जन्माला आल्यासारखे आपल्या वाट्याला आलेले दिवस जगून घ्या! नियम करा; तत्वज्ञान घ्या आणि द्या; बारीक, शक्य तितके बारीक विचार करा! वेळ छान जाईल! जगण्याचा कंटाळा येणार नाही!

( कोपऱ्यातला स्पॉट जाऊन दरवाज्यावर स्पॉट. मराठे धावत धावत स्पॉटमध्ये येतो. )

मराठे .... सर, सर तुम्ही पिनाकला पाहिलंत? मी आवाज ऐकला सर त्याचा!

आवाज .... मराठ्या, दोस्ता! तू मात्र जगायला नालायक आहेस! त्या खोट्या

म. प्र. सं. शा. ग्रंथालय शाखा.
[illegible] नों. दि
वि. [illegible]


बुरख्यांच्या जगात असली सच्चाई घेऊन जगलास तर तुझ्यावर तुटून पडतील सगळे बुरखे ! चेचतील रे तुला ! शहाणा असशील, तर वेडा हो ! बुटका हो !

(मराठे "पिनाक, पिनाक" असं अर्धवट पुटपुटत कुठेतरीच बघत निघून-जातो. त्याच्या "पिनाक, पिनाक" ह्या उद्गारांनी अस्वस्थ होत— )

शुभांगी ..— ही सुद्धां सगळी कशी बसल्यात बघाना भूत पाहिल्यासारखी ! शी : ! मी आले नसते तरच बरं झालं असतं !

(शांतता ! शुभांगी इकडे तिकडे पहाते अन् एकदम उत्साह आणीत ) ए ! Come on, boys ! नाही तर मी माझं सुरू करते कशी – (पोझ घेऊन नाटकीपणे ) माझ्याजवळ एक फोटो आहे सुंदर डोळ्यांच्या, राजबिंडया राजपुत्राचा ! त्याच्या सुंदर डोळ्यांत इतकी छान छान स्वप्नं असायची ! सारखी वेचाविशी वाटत ! माझ्याजवळ असला की त्याला दुसरं काही सुचतच नसे ! सारख्या कविता करायचा – माझ्यावर ! मी त्याच्या खांद्यावर डोकं ठेवून नुसत्या ऐकत राहायची ! पण हा माझा राजपुत्र हरवलाय हो ! द्याल शोधून ?

( हा पीस चालू असतानाच बाकीची फक्त हळूहळू, Original position मध्ये आणि पिनाक हळूहळू चालत शुभांगीच्या डोळ्यात पाहाण्याचा प्रयत्न करीत तिच्यापर्यंत येतो. पण ती वाचतच राहाते; तेव्हा मान खाली घालून त्याची exit. आवाज आणि लाइट हळूहळू फेड अप करीत— पूर्णविराम. )

IRBK-0115090
६४२६ [illegible]
३८८१ [illegible]

१ रूपाली
७७७ शिवाजीनगर
पुणे ४
१७ । १ । १९७४

प्रिय सुहास,

तुम्ही त्या दिवशी तुमच्या एकांकिकांचा संग्रह देऊन गेलात. परवा त्या वाचायला मुहूर्त मिळाला. तुमच्या एकांकिकांनी दिलेल्या आनंदाबद्दल प्रथम तुम्हांला मनःपूर्वक धन्यवाद देतो !

ह्या एकांकिका म्हणजे आजच्या संवेदनाशील तरुणाच्या मनावर भोवतालच्या परिस्थितीतून उमटणाऱ्या भल्याबुऱ्या चित्रांचा सुंदर असा नाट्यमय आविष्कार आहे. साहित्य हे प्रातिनिधिक असावे किंवा त्या त्या काळचे प्रतिबिंब वगैरे त्यात उमटलेलेच असले पाहिजे असला आग्रह कुणीही धरू नये; पण अनुभव कसलाही का असेना, तो साहित्यरूपाने प्रकटतो तो प्रतिसादाच्या शोधातच ! समाजात सगळीच माणसे काही आंधळेपणाने माळ करून जगत नसतात. जाणीवा चांगल्या जागृत ठेवून जगणाराही एक समाज असतो. इतरांना अधिक चांगल्या जाणीवांनी जगाकडे पाहाता यावे हा अशा समाजातील कलावंतांचा